



अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

**आयपीएल सामना क्र.१९**

Vs

कोलकाता नाईट रायडर्स
विरुद्ध सनराईजर्स हैद्राबाद

वेळ : सायं.७.३० वा.
स्थळ : ईडन गार्डन्स, कोलकाता

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि.१४ एप्रिल २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १९५ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## गस्तीसाठी आले गुरखे

### संदेशने ठोकली घराकडे धूम

आपल्या घरातील चौघेही पाण्यात बुडाल्याचे पाहून त्यांच्यासोबतच असणारा संदेश हा लहान मुलगा घाबरून घराकडे पळाला. घरी कर्णसिंग धनसिंग सिंग (वय ५६) आणि त्याचा पुतण्या बसंतदमाई सिंग हे घरी होते. संदेशने नदीपात्रातील प्रसंग सांगितल्यानंतर कर्णसिंग व बसंतदमाई यांनी नदीकडे धाव घेतली. ते ओरडत नदीकडे पळत असल्याचे पाहून गावकरीसुध्दा त्यांच्या मागोमाग नदीपात्राकडे पळाले. सर्वजण पाण्यात उतरले तेव्हा बालुदमाई आणि मनसरादमाई यांचे मृतदेह सापडले.

# चौघांना मिळाली भीमेत जलसमाधी

## नेपाळी कुटुंब झाले पोरके

सुराज्य/मंगळवेढा

**रात्रगस्त घालून कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी अवघ्या आठच दिवसांपूर्वी सिध्दापूर(ता.मंगळवेढा) गावात आलेल्या नेपाळी कुटुंबातील दोन महिला आणि दोन लहान मुलांचा गुरूवारी दुपारी भीमा नदी पात्रात बुडून मृत्यू झाला. मृतांमध्ये सासू-सुनेसह दोन नातवंडाचा समावेश असल्यामुळे पोटासाठी आलेले गुरखे कुटुंब पोरके झाले आहे.**

ही घटना गुरूवारी दुपारी दोनच्या सुमारास सिध्दापुरातील भीमा नदीपात्रात घडली. सायंकाळपर्यंत चारही मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आले. या घटनेनंतर सिध्दापूर गावावर शोककळा पसरली असून नेपाळी कुटुंबाचा आक्रोश पाहून गावकऱ्यांच्या डोळ्यातही अश्रू तरळल्याचे चित्र पाहण्यास मिळाले.

बालुदमाई कर्णसिंग सिंग(वय ३०), मनसरादमाई बसंतदमाई सिंग(वय ३०), नमुना कर्णसिंग सिंग (वय ११), हिरदेस बसंतदमाई सिंग (वय ८, सर्व रा. जुम्बुकॉच, ता. चामुंडा ब्रिंदासैनी, जि. दैलेक, राज्य काठमांडू, प्रदेश कर्नाली, देश नेपाळ) अशी मृतांची नावे आहेत.

गुरूवारी दुपारी बाराच्या सुमारास बालुदमाई कर्णसिंग सिंग(, मनसरादमाई बसंतदमाई सिंग ह्या दोघी सासू-सून धुणे धुण्यासाठी म्हणून सिध्दापुरातील भीमा नदीच्या पात्रात गेल्या होत्या. त्यावेळी त्यांच्यासोबत नमुना, हिरदेश व संदेश हेसुध्दा गेले होते. बालुदमाई आणि मनसरादमाई (सासू-सून) ह्या दोघी नदीपात्रातील पाण्यात धुणे धूत असताना नमुना, हिरदेश आणि संदेश हे तिघेही तिथेच





पाण्यात पोहत होते. पोहता पोहता नमुना व हिरदेश हे पाण्यात बुडू लागले. ते पाहून त्यांना वाचवण्यासाठी बालुदमाई आणि मनसरादमाई ह्या दोघीसुध्दा पाण्यात गेल्या. एकमेकांना वाचवण्याच्या प्रयत्नात चौघेही पाण्यात बुडाले.

### नमुना व हिरदेशचे मृतदेह सापडले सायंकाळी

दरम्यान, नदीकाठी गर्दी झाली. तोपर्यंत ही खबर पोलिसांनाही पोहचली. त्यामुळे पोलिसांचा फौजफाटा नदीकाठी आला. गावकऱ्यांच्या मदतीने दिवसभर मृतदेहाचा शोध सुरू होता. सायंकाळच्या सुमारास नमुना आणि हिरदेश यांचे मृतदेह सापडले. चारही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले. या घटनेची नोंद मंगळवेढा पोलीस ठाण्यात करण्यात आली असून सहाय्यक निरीक्षक पिंगळे पुढील तपास करीत आहेत.

### चौथ्या दिवशी चौघांचा मृत्यू

कर्णसिंग धनसिंग सिंग (वय ५६) आणि त्याचा पुतण्या बसंतदमाई सिंग हे आठ दिवसांपूर्वी सिध्दापुरात आले होते. रात्रगस्त घालण्याचे काम ते करत होते. सिध्दापुरात राहण्यास घर मिळाल्यानंतर कर्णसिंगची पत्नी बालुदमाई, पुतण्याची पत्नी मनसरादमाई, मुलगी नमुना, नातू हिरदेश आणि संदेश हे तीन दिवसांपूर्वी सिध्दापुरात आले होते. त्यानंतर चौथ्याच दिवशी या कुटुंबातील चौघांना जलसमाधी मिळाली.

## सेतूच्या निविदेचा सोमवारी जिल्हाधिकारी घेणार निर्णय

### पालकमंत्र्याचे सेतू सुविधा चालू करण्याचे आदेश

सुराज्य/सोलापूर

सेतू निविदा संपली आहे. यापुर्वी दोन वर्षापुर्वी मुदत वाढ दिली आहे त्यामुळे आता मुदत वाढ देण्याचा कार्यक्षेत्र आता माझे नाही त्यामळे मुदत वाढ देण्याचा किंवा प्रश्नच येत नाही या संदर्भात पालकमंत्र्यांची चर्चा झाली आहे. फेर निवदा बाबत आपण सोमवारी निर्णय घेणार असल्याचे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी सांगितले.

> माजी आ. प्रशांत परिचारक यांच्या पत्रावर पालकमंत्र्यांनी मारलेला शेराचे पत्र मला प्राप्त झाले आहे. याबाबत पालकमंत्री विखे पाटील यांच्याशी चर्चा देखिल झाली आहे. यापुर्वी मुदतवाढ दिली असल्याने आता मुदतवाढ देण्याचा प्रश्नच येत नाही ते कार्यक्षेत जिल्हाधिकाऱ्यांना आता राहिला नाही मात्र सोमवारी सोलापूरात आल्यानंतर फेर निविदा काढण्याबाबत आपण योग्य तो निर्णय घेऊ.
>
> **- मिलिंद शंभरकर (जिल्हाधिकारी सोलापूर)**

सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयातील सेतू कार्यालय बंद झाले आहे, मुदत संपल्यामुळे सेतू बंद करण्यात आला असल्याचे प्रशासानाचे म्हणणे मात्र विद्यार्थ्यां आणि नागरिकांची गैरसोय होऊन नये म्हणून ईमहासेवा केंद्रावर ऑनलाईन सुविधा उपल्बध करून दिली आहे. मात्र या केंद्रातून मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट होत असल्याने लोकप्रतिनिधींनी आणि सामाजिक संघटनानी सदरचा सेतू चालू करण्यासाठी जिल्हाप्रशासनास निवेदने देऊन सेतू कार्यालय चालू करण्याची मागणी केली सोलापूर दौऱ्यांवर आलेल्या पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना या संदर्भात पत्रकारांनी विचारणा केली असता लवकर बैठक घेऊन निर्णय घेण्याचे अश्वासन दिले होते. माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी पालकमंत्री विखे पाटील यांची भेट घेऊन सेतू कार्यालय बंद असल्यामुळे मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे सेतूतील कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. शाळ महाविद्यालय शेतकरी यांना उत्पन्नाचा, जातीचा अल्प भुधारक शेतकरी असल्याचा दाखला व प्रमाणपत्राची आवश्यकता असते तरी सोलापूरातील सेतू सुविधा केंद्र बंद करण्याचा निर्णयास स्थगिती देण्याची मागणी केली आहे .तसे पत्र पालकमंत्र्यांना दिले त्या पत्रावर पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांनी निविदा प्रक्रिया होईपर्यंत सेतू सुविधा चालू करावी असे आदेश प्रशांत परिचारक यांच्या पत्रावर दिले आहे. याबाबत जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांना विचारले असता मुदत वाढ देता येणार नाही मात्र नवीन निविदा बाबात सोमवारी सोलापूरात आल्यानंतर निर्णय घेणार असल्याचे सांगितले.

## सराईत गुन्हेगार सूरज सुरवसे स्थानबद्ध

सुराज्य/सोलापूर



शहरातील एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील सराईत गुन्हेगार सूरज ऊर्फ भैय्या गुंडप्पा सुरवसे (वय-३०,रा.सरवदे नगर, विडी घरकुल) यास एमपीडीए अंतर्गत १२ एप्रिलपासून स्थानबद्ध करण्यात आले आहे.

सूरज सुरवसे हा मागील अनेक वर्षांपासून अवैध आर्थिक फायदा मिळवण्यासाठी, जुना विडी घरकुल, गोंधळी वस्ती, राजेश पायलट चौक, रंगराज नगर, हैद्राबाद रोड, भारत नगर, मुळेगाव रोड, समाधान नगर, विडी घरकुल परिसर, मार्केट यार्ड या परिसरात व्यापारी व सामान्य नागरिकांमध्ये दहशत व भीती घालून गंभीर स्वरूपाचे गुन्हे करत होता. त्याच्या विरुद्ध शहरातील एमआयडीसी व जेल रोड पोलीस ठाण्यात ५ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. त्यास त्याच्या गुन्हेगारी कारवायांपासून परावृत्त करण्यासाठी दोन वर्षाकरीता तडीपार करण्यात आले होते. त्यानंतरही सुरज ऊर्फ भैय्या गुंडप्पा सुरवसे याच्या वर्तनात कोणताच बदल झाला नाही.त्यास एमपीडीए अंतर्गत स्थानबद्धतेचे आदेश दिले. ही कारवाई पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांच्या मार्गदर्शनाखाली, उपायुक्त डॉ. दीपाली काळे, उपायुक्त विजय कबाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. संतोष गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे सुनील दोरगे, वपोनि राजन माने, पोउपनि विशेंद्रसिंग बायस व एमपीडीए पथकातील अंमलदार पोहे विनायक संगमवार, सुदीप शिंदे, अक्षय जाधव, विशाल नवले यांनी केली.

## शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी एसआयटी

सुराज्य/मुंबई

शेतकऱ्यांना बेकादेशीररित्या कर्ज देणाऱ्यांवर काय कारवाई केली जाईल याचा आढावा घेण्यासाठी राज्य शासनाने विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करावी. शेतकरी का आत्महत्या करत आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी नेमके काय करता येईल, याचा आढावाही एसआयटीने घ्यावा, असेही आदेश लोकायुक्त विद्यासागर कानडे यांनी राज्य शासनाला दिले आहेत.

गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांनी याचा अहवाल चार आठवड्यात सादर करावा, असे आदेश देत लोकायुक्त कानडे यांनी ही सुनावणी तहकूब केली. परवाना नसताना कर्ज देणाऱ्यांची संख्या महाराष्ट्रा खूप आहे. शेतकरी अशा लोकांकडून कर्ज घेतात. कर्जाची परतफेड करण्यासाठी ते शेतकऱ्यांना त्रास देतात. या त्रासाला कंटाळूनच अनेक शेतकरी आत्महत्या करतात, असे निरीक्षणही लोकायुक्त कानडे यांनी नोंदवले. याप्रकरणी नंदूरबार येथील कोमल राम नथानी यांनी लोकायुक्त कानडे यांच्यासमोर तक्रार केली आहे. सुनील बाबुलाल पाटील हे कर्ज (ापशू श्रशपवळपस) देतात. त्यांच्याकडे कर्ज देण्याचा परवाना नाही. त्यांच्याकडून माझे पती राम नथानी यांनी कर्ज घेतले होते. ते कर्ज व्याजासह फेडण्यात आले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त पार्क चौकातील पुतळा परिसरात पूर्व संध्येलाच आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली.

### तिसरा डोळा

- प्रकाश पोरे



**आता घरात येतो का रहायला?**

| कल्याण |
|---|
| 236-17-250 |

| मेन बाजार |
|---|
| --------- |

# भाजप मोठ्या प्रमाणात डॉ. आंबेडकर जयंती साजरी करणार

## मागासवर्गीय मतांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न

सुराज्य/सोलापूर

आगामी काळात होणाऱ्या महापालिका निवडणुकिच्या पार्श्वभूमीवर भाजपने आपली रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून आता भाजप मोठ्या प्रमाणात आंबेडकर जयंती साजरी करणार आहे. त्यासाठी सोलापूर भाजप अनुसूचित जाती आघाडीला मैदानात उतरवले आहे. या नव्या प्रयोगामुळे मागासवर्गीय मतांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न भाजप करताना दिसून येत आहे.

महापालिका निवडणूक असो वा लोकसभा निवडणूक असो भाजप प्रत्येक निवडणूक व्यूहरचना करून लढतो, हे आतापर्यंत सिद्ध झाले आहे. आताही भाजपकडून तसेच नियोजन करण्यात येत आहे. प्रदेश भाजपाने संपूर्ण राज्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे सोलापूरसह सर्व जिल्ह्यात भाजपकडून न्याय सप्ताह साजरा करण्यात येत आहे.

सोलापूर शहरात आगामी काळात महापालिका निवडणूक, लोकसभा निवडणूक होणार आहे. ही निवडणूक समोर ठेवून भाजपने आता मागासवर्गीय मतांकडे आपला मोर्चा वळवला आहे. त्याचाच एक भाग म्हणून सोलापुरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त भाजप अनुसूचित जातीतर्फे



### इच्छुकांना आणले फोकसमध्ये

भाजप अनुसुचित जातीतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात येत आहे. यासाठी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये भाजपकडून महापालिका निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्यांनाही फोकस केल्याचे दिसून आले.

व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. माजी सामाजिक न्याय मंत्री दिलीप कांबळे यांना त्यासाठी मैदानात उतरवले आहे. त्यांचे डॉक्टर आंबेडकर यांच्या जीवनावर व्याख्यान आयोजित केले आहे. भाजपकडून अनुसूचित जाती घटकांची मोर्चेबांधणी या निमित्ताने केले जात असल्याचे दिसून येत आहे.

आजपर्यंत काँग्रेसकडून मागासवर्गीय मतांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. तीच मते काँग्रेससाठी निर्णायक ठरत होते. दरम्यान २०१९ रोजी सोलापूर शहरांमध्ये वंचित आघाडीचा प्रवेश झाला. खुद्द वंचित आघाडीचे सर्वा सर्वा प्रकाश आंबेडकर यांनी लोकसभा निवडणुकीत एन्ट्री केली त्यामुळे मागासवर्गीय मतांचे ध्रुवीकरण झाले. सुमारे पावणे दोन लाख मते प्रकाश आंबेडकर यांना मिळाली. दलित वर्ग मोठ्या प्रमाणात वंचितकडे वळाल्याचे या निवडणुकीत दिसून आले. प्रकाश आंबेडकर जर निवडणूक रिंगणात नसले असते तर कदाचित भाजप आणि काँग्रेसमध्ये अटीतटीची लढाई झाली असती असे बोलले जात आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीतही शहर उत्तर मधून आनंद चंदनशिवे यांना वंचित आघाडीतर्फे २५ हजारांपेक्षा जास्त मते मिळाली होती. मात्र त्यानंतर आनंद चंदनशिवे यांनी वंचित आघाडीला रामराम केला. तेव्हापासून शहरात वंचित आघाडीचा प्रभाव थोडा कमी झाला आहे. आता याचाच फायदा घेण्यासाठी भाजप सरसावली आहे. त्यामुळेच आता भाजप अनुसूचित जातीतर्फे आंबेडकर प्रेमींसाठी व्याखान्याचे आयोजन करण्यात आले आहे. प्रथमच भाजपकडून या कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. भाजपचा हा कार्यक्रम म्हणजे मागासवर्गीय मतांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयोग असल्याचे बोलले जात आहे.

## 'ह्या' एकीला काय अर्थ?

आगामी लोकसभा निवडणुकीत बिगरभाजप पक्षांना एकत्र आणण्याच्या प्रयत्नांना वेग आला आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी बुधवारी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधी यांच्याशी त्याबाबत प्रदीर्घ चर्चा केली. दुसरीकडे, राज्यातही महाविकास आघाडी बळकट करण्याच्या हालचाली सुरू असून, नेत्यांच्या भेटीगाठींना वेग आल्याचे पहायला मिळाले. काँग्रेसने हिरवा कंदील दिल्यानंतर विरोधकांच्या एकजुटीसाठी पुढाकार घेऊ, अशी भूमिका जनता दलाचे (संयुक्त) प्रमुख नितीशकुमार यांनी मांडली होती. त्यानुसार बुधवारी खरगेंच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत विरोधकांच्या एकजुटीवर मतैक्य झाल्याचे सांगण्यात आले. विरोधी पक्षांनी एकत्र येऊन आगामी निवडणुका लढवण्याचा निर्णय घेतल्याचे खरगे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. मात्र, काँग्रेसप्रणित महाआघाडीला आम आदमी पक्ष, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष आदींनी कडाडून विरोध होतो आहे हेही दुर्लक्षून चालणार नाही. तेलंगणचे मुख्यमंत्री व भारत राष्ट्र समितीचे प्रमुख के. चंद्रशेखर राव यांनी काँग्रेसला वगळून तिसऱ्या आघाडीचा घाट घातला होता. या वास्तवाची जाणीव असल्यामुळे नितीशकुमार यांनी, ''अधिकाधिक पक्षांशी संवाद साधून त्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला जाईल'', असे पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या काळात खरगेंनी विरोधी पक्षांच्या नेत्यांची बैठक घेतली होती. त्यानंतर त्यांनी द्रमुकचे प्रमुख स्टॅलिन, शिवसेनेचे (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आदींशी फोनवरून संपर्क केला होता. त्याचा उल्लेखही नितीशकुमार यांच्याकडून केला गेला. खरगेंनी काही विरोधी पक्षांच्या प्रमुखांशी चर्चा केली आहे. आज झालेल्या चर्चेच्या आधारे विरोधकांच्या ऐक्याची प्रक्रिया पुढे नेली जाईल. सहमत होणाऱ्या पक्षांशी सविस्तर चर्चा केली जाईल. त्यासाठी आम्ही पुन्हा बैठक घेणार आहोत'', असे नितीशकुमार म्हणाले. किती बिगरभाजप पक्ष सहभागी होतील, या प्रश्नावर, 'बैठकीवेळी कळेलच', असे उत्तर नितीशकुमार यांनी दिले. बैठकीला राष्ट्रीय जनता दलाचे नेते व बिहारचे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादवही उपस्थित होते. नितीशकुमार यांनी दिल्लीचे मुख्यमंत्री



अरविंद केजरीवाल यांचीही भेट घेऊन त्यांना भाजपविरोधी आघाडीत सहभागाचे आवाहन केले.भाजप धार्मिक ध्रुवीकरणाचा प्रयत्न करत असून, भाजपविरोधी पक्षांनी एकत्र यावे, असे माकप नेते सीताराम येचुरी म्हणाले. आगामी लोकसभा निवडणुकीनंतर भाजपविरोधी आघाडीच सत्ता स्थापन करेल, असा विश्‍वासही त्यांनी विश्वास केला. तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष ममता बॅनर्जी, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी आघाडी न करता स्वतंत्रपणे आगामी लोकसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय जाहीर केला आहे. बहुजन समाज पक्षाच्या सर्वेसर्वा मायावतींनी काँग्रेस आणि भाजपपासून दूर राहण्याचे ठरवले आहे. बिजू जनता दल, वायएसआर काँग्रेस, भारत राष्ट्र समिती या पक्षांची काँग्रेसच्या महाआघाडीत दाखल होण्याची तयारी नाही. 'तेलुगू देसम'चे चंद्राबाबू नायडू यांनी गेल्या लोकसभा निवडणुकीत विरोधकांच्या एकजुटीसाठी प्रयत्न केले होते. यावेळी मात्र, ते तटस्थ आहेत. या वेगवेगळ्या प्रादेशिक पक्षांशी संवाद कसा साधला जाणार, हे खरगे व नितीशकुमार यांच्या बैठकीतून स्पष्ट झालेले नाही.काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाळ हे गुरुवारी उद्धव ठाकरे यांची भेट घेण्यासाठी मुंबईत येणार आहेत. राहुल गांधी वा काँग्रेसने सावरकरांचा मुद्दा उपस्थित करू नये, अशी शिवसेनेची भूमिका आहे. अर्थात, राहुल गांधी ती मान्य करतील का, याबद्दल राज्यातील काँग्रेस नेते साशंक आहेत. मात्र, शरद पवार-उद्धव ठाकरे यांची झालेली भेट आणि काँग्रेसचे सरचिटणीस वेणुगोपाळ यांच्या गुरुवारच्या मुंबई दौऱ्यातून महाविकास आघाडी बळकटीकरणास मदतच होईल, असे आघाडीच्या नेत्यांचे मत आहे. विरोधी पक्षांना एकत्र करण्यासाठी उचललेले हे ऐतिहासिक पाऊल आहे. सध्या घटनात्मक संस्थांवर आक्रमण होत असून, त्याविरोधात आम्ही एकत्रितपणे लढा देऊ, असे विरोधक म्हणत आहेत पण विरोधी पक्षांमध्ये अजूनही एकवाक्यता नाही. नितीश व केजरींची प्रेस सुरू होती. त्यावेळी केजरींनी आपली भूमिका सांगत असतानाच पत्रकारांनी हस्तक्षेप करून पंतप्रधानपदाचा उमेदवार नितीश असतील का? असा प्रश्‍न विचारताच नितीश हे गडबडले आणि प्रश्‍नकर्त्या पत्रकारांना आवरण्याचा प्रयत्न केला. विरोधक एक येतील हा लोकशाहीचा भाग झाला. काँग्रेसला रोखण्यासाठी व्ही. पी. सिंग यांनीही तिसऱ्या आघाडीचा उद्योग केला होता. आजच्या भाजप विरोधकांमध्ये घट्ट एकी होताना दिसत नाही. धोरण नाही. विकासाचा अजेंडा नाही. केवळ मोदी विरोध हा एकच कार्यक्रम. विरोधकांना आपली दिशाच दिसत नसेल तर त्या एकीला काय अर्थ?

जयंतीनिमित्त

# ५१ बैलजोड्या जुंपून काढली डॉ. बाबासाहेबांची मिरवणूक!

**सोलापूर जिल्ह्यातील कसबे तडवळे गावी परिषदेसाठी डॉ. बाबासाहेबांनी २२ व २३ फेब्रुवारी १९४१ हे दोन दिवस मुक्काम केले. मुंबईवरून आल्यावर तडवळे येथे कार्यकर्त्यांनी परिषदेच्या तयारी बाबत एका बैठकीचे आयोजन केले. त्या बैठकीमध्ये एक प्रचंड जोश होता. आपले उद्धारक, देशाचे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या स्वतः आपल्या गावात येणार.. ही गोष्टच त्या सर्व लोकांना बळ देणारी, उत्साह देणारी होती. सगळेजण हरकून गेले होते. त्यांना यावर कसा विश्वास ठेवावा ते कळत नव्हतं. आपल्या तडवळे सारख्या एका खेड्या गावात बाबासाहेब स्वतः येणार तेही दोन दिवस म्हणजे एक मुक्कामी येणार.. काय करावं आणि काय करू नये? असं सगळ्यांना झालं होतं.**

---------------------------------------------

कसबे तडवळे हे गाव एकोपा असणारे गाव होतं. गावात सगळेजण गुण्यागोविंदाने राहत होते. त्याच गावात हरिभाऊ तोरणे मास्तरांनी आपल्या शाळेच्या माध्यमातून गावकऱ्यांमध्ये समतेचा, एकोप्याचा संदेश पेरलेला होता. बाबासाहेबांचे क्रांतिकार्य गावातील नागरिकांना सांगत असत. त्यामुळे बाबासाहेबांबद्दल गावकऱ्यांच्या मनात चांगली भावना होती. बाबासाहेबांच्या आगमनाची अशी सगळी व्यवस्था होत असताना बाबासाहेब आल्यानंतर त्यांचं रेल्वे स्टेशनपासून परिषदेच्या ठिकाणापर्यंत जंगी मिरवणूक काढून स्वागत करायचं. तर बाबासाहेबांची मिरवणूक काढायची यावर सगळ्यांचा क्षणात होकार आला. पण मिरवणूक काढायची कशी? सगळे शांत बसलेले असतानाच एक कार्यकर्ता उभा राहिला आणि उत्स्फूर्तपणे बोलला आपण आपल्या बाबासाहेबांची मिरवणूक बैलगाडीतून काढू. तो तसा बैलगाडीतून शब्द उच्चारला तसं इतर वरिष्ठ कार्यकर्ते त्याच्यावर ओरडले. अरे या देशाचे नेते, आपले उद्धारक, भले भले ज्यांना सलाम करतात, त्या आपल्या मुक्तिदात्याला बैलगाडीतून आणायचं? कसं वाटेल त्यांना बैलगाडीतून आणलं तर त्यांचा अपमान होईल. त्यांना बैलगाडीतून आणावं तर वाट नीट नाही, वाटेत खड्डे खाचखळगे आहेत. त्यांना त्रास होईल बैलगाडीतून येताना. त्यामुळे बैलगाडीत नको असे काही जण बोलले. पण हे सगळं बोलत असताना आता बैलगाडी शिवाय आपल्याकडे इतर कोणता पर्याय नाही, याचीही जाणीव सर्वांना होत होती.

आपल्या बाबासाहेबांची मिरवणूक आपण त्या बैलगाडीला ५१ बैलजोड्या जुंपून काढायची का? त्यांनी जशी ही कल्पना मांडली तशी ही वेगळी कल्पना. सर्वांनाच आवडली सर्वांनी त्याचे उत्स्फूर्तपणे कौतुक केलं. बैलगाडीने बाबासाहेबांची मिरवणूक काढायची त्याला ५१ बैलजोड्या जुंपायचे हे खर आहे , पण आपल्या कोणाकडेच बैलगाडी किंवा बैल नाहीत, हे कुठून आणायचं सगळं ! हा त्याचा प्रश्न होता आणि सर्वांची तोंड आता बंद झाले होते. यातील सगळेच कार्यकर्ते कोणाच्या ना कोणाच्या शेतावर बैलगाडी हाकणारे मजुरी करणारे होते, तर त्यांनी प्रत्येकाने आपल्या मालकाला मिरवणुकीसाठी बैल देण्याबाबत गळ घालायची आणि बैलगाडी गावातील श्री गणेश लालजी डाळे या मारवाडी इसमाकडे मागून पाहायची असे ठरले. सारे कार्यकर्ते गणेश लालजी डाळे यांना जावून भेटले आणि त्यांना सांगितलं. बाबासाहेबांची मिरवणूक स्टेशन पासून ते परिषदेच्या ठिकाणापर्यंत काढायची, त्यासाठी आम्हाला तुमची बैलगाडी हवी म्हणून आम्ही तुम्हाला विनंती करायला आलोय. आता आपल्याकडेच काम करणारे, रोजंदारीवर असणारे माणसं काहीतरी विनंती करतात, यांना कसं नाराज करायचं, हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला व शेवटी गणेश लालजी डाळे यांनी बैलगाडी देण्यास होकार दिला. ते म्हणाले, देशातील मोठे नेते दलितोउध्दारक बाबासाहेब आपल्या गावात येत आहेत, आणि तुम्ही सगळे त्यांच्यावर इतकं मनापासून प्रेम करतात, तुमच्या या परिषदेला माझं हे सहकार्य म्हणून तुम्ही माझी गाडी बैलगाडी आणि बैल ही घेऊन जा अशी डाळे यांनी मान्यता दिली आणि बैलगाडीची आणि दोन बैलांची सोय झाली. आता इतर बैले जमा करणं हे खरं आव्हान होतं, तर सर्वांनी गावातील ज्यांच्याकडे बैल आहेत त्यांच्याकडे आपण मजुरीला जातो, त्यांना बैलांबाबत विचारणा केली व बैल देण्याबाबत गळ घातली. त्यामुळे आपल्याकडे आलेल्या आपल्याच मजुरांनी मागणी केलेल्या काही तासांसाठीच्या बैलांच्या मागणीला अनेकांनी होकार दिला आणि बैलगाडी साठी लागणाऱ्या ५१ बैलजोड्यांची जुळवाजुळव झाली.

तिकडे कार्यकर्त्यांनी डाळे यांची बैलगाडी बाहेर काढली आणि बैलगाडी सजवण्याचे काम सुरू झालं. बैलगाडीला रंग देण्यात आला. रंगीबेरंगी पानाफुलांनी बैलगाडी सजवली गेली. बैलगाडीला फुलांचा माळा घालण्यात आल्या. बैलांच्या पाठीवर झुली टाकण्यात आल्या. शिंगे रंगवली, गळ्यात चंगाळी बांधली, सारा माहोल बदलला. आमदार जिवाप्पा ऐदाळे, हरिभाऊ तोरणे यांनी परिषदेची चोख व्यवस्था केल्याची पाहणी केली. बाबासाहेबांच्या निवासस्थानाची व्यवस्थित पाहणी केली. सगळ्या गोष्टी जिथल्या तिथे आहेत की नाही याची पाहणी केली.



बाबासाहेबांचे स्वागत आपण असं जंगी स्वागत करू. सभा घ्यायची, परिषद होणार म्हणजे स्टेज, मंडप, स्पीकर, रंगीत झालर , कापड, खुर्च्या, टेबल पाहिजेत, रंगबिरंगी पडदे असले पाहिजेत, स्टेजवर गाद्या असल्या पाहिजेत, ज्यांची नावे घेतली गेली होती यातली कोणतीच गोष्ट त्या तडवळे गावात उपलब्ध नव्हती. आता हे सगळं आणायचं तर कुठून आणायचं? कसं आणायचं? हा प्रश्न सर्वांपुढे उभा होता. स्टेजच्या चारी कोपऱ्यावर रानातली चांगली वाळलेली झाडे तोडून त्याच्या दांड्या उभ्या केल्या गेल्या. त्याला आधार देणाऱ्या दांड्या लावल्या गेल्या. स्टेज वरती मांडव घालावा. तशा दांड्या बांधल्या त्याच्यावर मंडपाचे कापड नाहीये ना.. तर थेट पत्रे आणून स्टेजवर मंडप तयार झाला. आता हे सुंदर सजवलं पाहिजे. मग रानावनात जाऊन अनेक कार्यकर्त्यांनी केळीची खुंट तोडून आणली. आंब्याची तोरणं लावली. सभोवतालचा परिसर सजवला गेला आणि बघता बघता परिषदेसाठीचा मंडप तयार झाला. आपल्या उद्धारकर्त्याला जेवायला कशात वाढायचं? बाबासाहेब तर मुक्कामी येणार आहेत, बाबासाहेब मुक्काम करणार कुठे? बाबासाहेबांसाठी मुक्कामाची सोय कशी करायची? याचे उत्तर मात्र अवघड होते. कारण गावातील सवर्णांची घरे मिळण तर अशक्य होतं, दलितांच्या पुढाऱ्याला कोण आश्रय देतो.. हा प्रश्न निर्माण झाला आणि साऱ्यांचेच चेहरे उतरले! तेवढ्यात हरिभाऊ तोरणे मास्तरांनी एक उपाय सुचवला. आयुष्यभर शाळेत रमलेले गुरुजी म्हणाले, आपल्या गावात जी लोकल बोर्डाची शाळा आहे, त्या शाळेचा एक वर्ग आपण नीटनेटका करून आणि त्या वर्गात बाबासाहेबांच्या मुक्कामाची सोय करू, सर्वांना तोरणे मास्तरांनी सांगितलेला शाळेचा उपाय मान्य करावा लागला. बाबासाहेबांची व्यवस्था ज्या वर्गात खोलीत करण्यात आली होती, त्या वर्ग खोलीच्या आजूबाजूंनी परिसरात काही स्वयंसेवकांची संरक्षणासाठी निवड करण्यात आली. बाबासाहेबांच्या सुरक्षिततेकडे आमदार जिवाप्पा ऐदाळे यांनी विशेष लक्ष दिले.

अखेर बाबासाहेब येण्याचा दिवस जवळ येत होता, तशी गर्दी जमा होत होती. २२ फेब्रुवारीचा दिवस, रेल्वेची वेळ ठरलेली होती, गर्दी तडवळे स्टेशनकडे कूच करत होती, तरुणांमध्ये उत्साह संचारला होता. सारा गाव बाबासाहेबांच्या स्वागतासाठी तयार झाला होता. हलगी, तुतारी, लेझीम, ढोल अशी सारी स्वागताची जय्यत तयारी करून सारी मंडळी तडवळे ढोकी कळंब रोड रेल्वे स्टेशनच्या परिसरात जमले होते. सारे जण वाट पाहत होते. आपला मुक्तिदाता येण्याची. बाबासाहेब येणार.. या विचाराने सारे जण उत्साही झाले होते. ठीक १२ वाजले. स्टेशनवरील घड्याळात बाराचे ठोके पडत होते आणि बार्शी लाईट रेल्वे गाडी स्टेशनात आली. गाडी जशी स्टेशनात आली, तशी सारी जनता, सारी गर्दी बेभान झाली. बाबासाहेबांच्या नावाचा जयघोष सुरू झाला, घोषणांचा आणि सनई, तुतारी , ढोल लेझीम आवाज गगनाला भिडला. सर्वांच्या अंगामध्ये एक वेगळाच उत्साह संचारला होता.. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो.. बाबासाहेब कोण आहेत, दलितांचे राजा आहेत. अशा घोषणांनी आसमंत दुमदुमन गेला प्रत्येकाचे रक्त सळसळत होतं, आपला मुक्तिदाता देशातील महान पंडित, राष्ट्रपुरुष, कायदे पंडित, दलितोद्धारक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आपल्या गावच्या धरतीवर येत आहे. हा विचारच प्रत्येकाला वेड लावत होता. घोषणांनी आसमंत निनादला होता. इतक्यात त्या रेल्वेच्या डब्यातून एक भारदस्त व्यक्तिमत्व प्लॅटफॉर्मवर उतरले, गौरवर्ण, विशाल कपाळ, चेहऱ्यावर बुद्धिमत्तेचे तेज, करारी नजर, प्रत्येक पावलात विश्वास, उरात स्वाभिमान अशा रुबाबदार बाबासाहेबांना पाहून उत्साहाला भरतं आलं. सारे जण बाबासाहेबांच्या जवळ जाण्यासाठी, त्यांना हार घालण्यासाठी, त्यांना स्पर्श करण्यासाठी, त्यांचा दर्शन घेण्यासाठी, धडपडू लागले. सर्वांची झुंबड उडाली, अनेक जण जागेवरूनच बाबासाहेबांकडे बघून दोन्ही हात जोडून आभाळाकडे पाहू लागले. अनेकांच्या डोळ्यातून आसवं वाहू लागली. सुटबुट टाई कोटातले बाबासाहेब साऱ्या गर्दीत राजबिंडे दिसत होते. त्यांच्या दर्शनाने अनेकांना आपल्या पिढ्यांचा उद्धार झाल्यासारखं वाटत होतं. सारे जण जिथे आहे, तिथूनच नतमस्तक होत होते. आपला भाग्यविधाता आपले उद्धारकर्ते , आज साक्षात आपल्यासमोर आहेत. यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता. कसं व्यक्त व्हावं हे त्यांना कळत नव्हतं आणि अनेकांच्या डोळ्यातील आसवं घळाघळा ओघळत होती. अनेक जण मातीला स्पर्श करून ती माती कपाळाला लावत होते. बाबासाहेबांची पावलं स्टेशनच्या बाहेर मातीत पडायला लागली.

बाबासाहेबांना आणखीन माहित नव्हतं की, येथून पुढे आपली व्यवस्था काय आहे. इतक्यात बाबासाहेबांना बैलगाडीकडे नेण्यात आलं. आणि सूट बूट घातलेले बाबासाहेबांना उंच असणाऱ्या बैलगाडीत चढणं थोड अवघड वाटायला लागलं. त्यामुळे बाबासाहेब थोडे अडखळल्यासारखे झाले. हे तेथे असणाऱ्या तरण्याबांड पोरांच्या लक्षात आलं, तशी एक नाही दोन-चार पोरं पुढं आली. आणि बाबासाहेबां समोर गाडीचा मागच्या बाजूला त्या पोरांनी गुडघ्यावर वाकून आपले कोपर जमिनीला टेकले आणि बाबासाहेबांना आपल्या पाठीवर पाय देऊन बैलगाडीत जाण्याची विनंती केली. कोणतं प्रेम होत हे.. काय नातं होतं. त्यांचं बाबासाहेबांशी.. कोणत्या विश्वासाने आपला जीव बाबासाहेबांवर ओवाळून टाकत होती ही सगळी माणसं.. बाबासाहेबांचे मन भरून आलं! धडपडणाऱ्या त्या पोरांना बाबासाहेबांनी हाताने उभा रहा असं सांगत त्यांना उभं केलं. पाठीवर हात थोपटत, अरे पोरांनो असं झुकायचं नाही. असं वाकायचं नाही. सांगितलं आणि बाजूला उभा केलं. त्या पोरांना आपल्या मुक्तिदात्यांनी बाबासाहेबांनी आपल्याला स्पर्श केला, आपल्या पाठीवर पाय देण्यास नकार दिला, आपली काळजी घेतली.. ही गोष्ट त्यांच्या हृदयाचा ठाव घेणारी होती. बाबासाहेबांनी आपल्याला स्पर्श केला या भावनेनेच त्यांना आभाळ ठेंगणं झालं. आनंदाने ती पोरं वेडीपिशी झाली आणि ती पोरं रडायला लागली.. कोण आनंद झाला होता त्यांना.. की बाबासाहेबांनी आपल्याला काहीतरी सांगितलं, प्रेमाने स्पर्श केला.

इतक्यात बाजूला उभे असणाऱ्या दोन-तीन पोरांनी भले मोठमोठे दगड उचलून आणले आणि बैलगाडीच्या बाजूला ते ठेवले त्या दगडांच्या पायऱ्या तयार झाल्या. बाबासाहेबांनी त्या दगडांवर पाय दिला आणि बाबासाहेब बैलगाडीत चढले बैलगाडीत पुढच्या बाजूला दोन फळ्या टाकल्या होत्या. त्या फळ्यांवरती रग अंथरला होता. बाबासाहेबांना त्यावर बसण्यासाठी सांगण्यात आलं, बाबासाहेब त्यावर बसले. वर बसलेले बाबासाहेब एखाद्या राजासारखे भासत होते आणि सारी जनता बैलगाडीच्या पुढे मागे बाबासाहेबांचा मोठमोठ्याने जयजयकार करत घोषणा देत चालत होती. त्या घोषणा आसमंत दुमदुमत होता. बाबासाहेब कोण आहेत दलितांचा राजा आहे बोलो भीम भगवान की जय अशा घोषणांनी आसमंत दुमदुमला. बैलगाडी चालायला लागली बाबासाहेबांनी पुढे पाहिलं. बैलगाडीच्या पुढे दोन नव्हे तर ५१ बैलजोड्यांची रांग लागली होती आणि त्या बैलांच्या पुढे वाजंत्री होते. सनई चौघडे होते ढोल ताशा निनादत होते. त्याच्यापुढे तर पोरं लेझीम खेळत होती, रस्त्याच्या दोन्ही बाजूने लोकांनी बाबासाहेबांना पाहण्यासाठी, बाबासाहेबांचे दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती आणि बाबासाहेबांची मिरवणूक निघाली होती. बाबासाहेबांना ती बैलगाडीच्या पुढे असणारी बैलांची रांग.. जीव ओवाळून टाकणारी पोर.. कार्यकर्ते आणि बैलगाडीत बसलेलो आपण.. हे सार पाहून बाबासाहेबांचा उर भरून आला.. आणि नकळत बाबासाहेबांच्या डोळ्यात आसव दाटली.. का दाटली बाबासाहेबांच्या डोळ्यात आसवं?

**-आनंद व्हटकर**
**दयानंद कॉलेज सोलापूर**
**९८२२६१६११३**

जन्म हा अखेरचा

## कायानुग्रहस्थल - २



मंदिरात देवदर्शनासाठी जाणारा मनुष्य सभोवतालच्या बाजारात, दुकानात रमतो आणि देवाला विसरतो. 'करने चले रामभजन । ओटन लगे कपास ।।' अशी आपली अवस्था असते.

एक मनुष्य मंदिरात देवदर्शनासाठी निघाला होता. त्याचे हात रिकामे होते. देवदर्शनाला जाताना काहीतरी घेऊन गेले पाहिजे, रिक्त हस्ते जाऊ नये, असा संकेत आहे. शेजारच्या दुसऱ्याच्या शेतातला थोडा कापूस वेचून न्यावा म्हणजे देवासमोर वात लावता येईल, असे त्याला वाटले. त्याप्रमाणे तो शेतात शिरला आणि कापूस वेचू लागला. कापूस वेचताना त्याच्या मनात विचार आला की, नुसती वात करुन काय उपयोग? दिव्यात घालायला तेलदेखील हवे. तेल तर आपण आणले नाही. याच शेतातला अधिक कापूस वेचून तो जर मंदिराशेजारच्या दुकानात विकला तर तेल विकत घेता येईल, असे त्याला वाटले. मग तो अधिक कापूस वेचण्याच्या मागे लागला. माणसाच्या मनात लोभ दडून बसलेला असतो.

शेत दुसऱ्याचे आणि रखवालदार कुणी नाही असे असताना अधिक कापूस वेचला तर काय बिघडते, असा विचार त्याच्या मनात आला त्याने शेतातला सर्व कापूस वेचला आणि तो विकून पैसा मिळवला. तो पैसा उद्योगधंद्यात घालून आणखी कमाई सुरु केली. या सर्व व्यापात त्याचे देवदर्शन मात्र राहून गेले. निघाला होता देवदर्शनाला, पण गुंतून पडला माया-बाजारात! अशीच सर्व जीवांची स्थिती असते. मातृगर्भातला जीवात्मा 'ईश्‍वर' मला यातून मुक्त कर. मी बाहेर पडताच तुझे स्मरण नित्य करीन, अशी प्रार्थना करीत असतो. परंतु गर्भाबाहेर पडताच तो सारे विसरुन जातो. इतका विसरुन जातो की कुणी त्याला 'देवदर्शनाला चल' असे म्हटले तर तो 'मला वेळ नाही' असे म्हणतो. त्याच्या आत प्रवेशलेल्या मायेचा तो प्रताप आहे. भगवंतावर प्रेम करायला प्रारंभ केला की माया हळूहळू काढता पाय घेते. मायेच्या अधिपतीला, परमेश्‍वराला शरण गेल्यावर मायासागर तरुन जाता येते, असे गीतेत म्हटले आहे. भगवंतापासून दूर गेल्यामुळेच मनुष्य मायाजालात फसतो. **(क्रमशः) – काशी जगद्‌गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

## महान योध्दा भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला पाहिजे. स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजनीतिज्ञ, तत्त्वज्ञ, समाजसुधारक, पत्रकार, वकील अशा महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महु इथे झाला व संपूर्ण भारतवर्षे सूर्यासारखे लखलखायला लागले. जणू काय बाबासाहेबांच्या रूपात या पृथ्वीतलावर दैवी शक्तीच प्रगट होऊन ज्ञान जोत प्रगटली की काय असे सर्वांनाच वाटत होते.

बाबासाहेबांनी समाजाच्या हितासाठी आणि देशहितासाठी आपले प्राणपणाला लावले. त्यामुळेच त्याच्या अथक प्रयत्नाने संविधानाच्या चौकटीत संपूर्ण भारताला बांधून ठेवले.आज प्रत्येकाला संविधानाच्या माध्यमातून न्याय मिळत असतो. आजही अनेक देशांमध्ये हुकूमशाही दिसून येते. परंतु बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानामुळेच भारतीय लोकशाही टिकून आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी तळागाळातील लोकांना न्याय मिळावा यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. तेव्हाच भारतात न्यायव्यवस्था प्रस्थापित झाली. कारण बाबासाहेबांना कल्पना होती की काही मूठभर समाज देशातील सर्वसामान्यांना कलंकित करण्याचे काम करीत आहे. परंतु बाबासाहेबांचे या संपूर्ण हालचालींवर लक्ष होते. याकरिता समाजात जातीयवाद, धर्मवाद, पंथवाद यात कटुता निर्माण होऊ नये याकरिता सर्वांना एकत्र आणण्याचे काम त्यांनी केले. आज जगामध्ये अनेक देशात बाबासाहेबांच्या विचारांची जोपासना केली जाते. कारण बाबासाहेबांच्या विचारांमध्ये ज्ञानाचा व बुद्धिमत्तेचा अथांग महासागर आहे. त्याची तुलना समुद्रापेक्षाही अफाट आहे. कारण त्यांच्या बुद्धिमत्तेचा व कौशल्याचा संपूर्ण जगात आजही गुणगान होताना आपण पाहतो.

आज भारतात संपूर्ण समाज आनंदाने राहतो व बागडतो ते फक्त बाबासाहेबांच्या विचारांमुळे व संविधानामुळेच. मनाने व विचाराने खूप श्रीमंत होते. प्रत्येकाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन देश घडविण्याकरिता पुढाकार घेण्याची गरज आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम!

**- रमेश लांजेवार, नागपूर.**

वैचारिक

# दीक्षाभूमी : सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळ

१४ ऑक्टोंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या ठिकाणी हजारो अनुयायांच्या साक्षीने बौध्द धर्मांत प्रवेश केला. ते ठिकाण म्हणजे नागपूर! हे ठिकाण 'दीक्षाभूमी' म्हणून ओळखले जाते. या दीक्षाभूमीने या सर्वकषक्रांती घडवून आणली. 'दीक्षाभूमी'ला केवळ भौगोलिक किंवा ऐतिहासिक संदर्भाची पार्श्वभूमी लाभलेली नसून या भूमीला परिवर्तनाचे मूल्य ही प्राप्त झाले आहे. याचे कारण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'धर्मांतराची' क्रांतीकारक घटना या भूमीवर घडविली. या भूमीने नवा इतिहास घडविला. अशा या महामानवाच्या व्यक्तिमत्वाचा ठसा सर्व भारतभर उमटला याला दीक्षाभूमी तर अपवाद कशी राहणार? सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक सांस्कृतिक संदर्भ आणि मूल्य आहे. बौध्द धर्माची दीक्षा घेतेवेळी आपल्या हजारो अनुयायांसमोर नागपूर'चे ऐतिहासिक महत्व पटवून देतांना आपल्या भाषणात म्हणाले, 'भारतात बौध्द धर्मांचा प्रसार जर कोणी केले असेल तर तो या नाग लोकांनी. नाग लोक आर्यलोकांचे भयंकर शस्त्रू होते. आर्यांनी नाग लोकांना जाळून टाकल्याचे पुरावे पुराणात सापडतात ज्या नाग लोकांना एवढा छळ सहन करावा लागला. त्यांना वर येण्यासाठी कोणी तरी महान पुरूष हवा होता. त्यांना ते महापुरुष भगवान गौतम बुध्दाच्या रूपाने भेटले. भगवान बुध्दाचा उपदेश नाग लोकांनी सर्व भारतामध्ये पसरविला, असे आपण नाग लोक आहोत. नाग लोकांची मुख्य वस्ती नागपूर येथे व त्याच्या आसपास होती म्हणून या शहरास 'नागपूर' म्हणजे नागलोकांचे गाव ते हेच नागपूर होय. याच कारणामुळे बौध्द धर्मांच्या दीक्षा सोहळ्यासाठी नागपूर हे स्थळ निवडले आहे, यावरूनच दीक्षा भूमीचे महत्व सर्व दलित बांधवाच्या जीवनात किती अनन्यसाधारण आहे हे ध्यानात येते.



आजही ही दीक्षाभूमी प्रेरणादायी, चेतनादायी आणि युवकांना, स्फुर्तीदायी आहे यात शंका नाही. दलित समाजाची असहाय्यता, मनाचा कमकुवतपणा कधीच मागे न हटणारे दारिद्र्य आणि या सर्वांच्या जोडीला धावून येणारा अज्ञानीपणा या सर्व अडचणींवर तोडगा म्हणजे 'धर्मांतर'! ज्या भूमीवर धर्मांतराची महत्व पूर्ण घटना घडली, त्या घटनेवर सामाजिकतेच्या दृष्टिने विशेष महत्व आहे. देशातील तळागाळातील लोकांच्या मनात जीवंत स्वाभिमानाची भावना निर्माण करून जीवनाकडे पाहाण्याचा त्यांचा दृष्टिकोन बदलविला. लाखो लोकांनी एका क्षणात जुन्या परंपरागत विचारांचा, चालीरीतींचा त्याग केला. आपल्या हाती राजकीय सामर्थ्य आल्याशिवाय 'सत्यमेव जयते'! हे ब्रीद पोकळ आहे. 'सत्याचा विजय होण्यासाठी आपली चळवळ कायम ठेवली पाहिजे, आपण सत्याच्या विजयासाठी लेखणीचे, चळवळीचे शस्त्र हातात घेतले पाहिजे, ही भावना निर्माण होऊन चळवळीतून अनेक तरूण लिहिते झाले आणि संकुचित विचाराच्या वाटेने जाणाऱ्या मराठी साहित्याच्या कक्षा रूंदावू लागल्या. मी मिळविलेल्या ज्ञानशक्तीचा उपयोग केवळ कुटुंबासाठी आपल्या नातेवाईकासाठी करणार नाही तर सर्व अस्पृश्य समाजाच्या चळवळीसाठी तिचा उपयोग करणार ह्या महामानवाच्या केलेल्या निर्धाराच्याच वाटेवरून जाण्यासाठी धडपडू लागली. अस्पृश्यांचे प्रश्न जगाच्या चव्हाट्यावर मांडून त्याकडे सर्व जगाचे लक्ष वेधू शकेन हा आत्मविश्वास डॉ. बाबासाहेबांच्या रूपाने याच दीक्षाभूमीने नवोदित साहित्यिकांच्या मनामध्ये उत्पन्न केला.

'अस्पृश्यांची समस्या म्हणजे प्रचंड हिमालय आहे. या हिमालयाशी टकरा मारून मी माझे डोके फोडून घेणार आहे. हिमालय कोसळला नाही तरी माझे रक्तबंबाळ डोके पाहून अस्पृश्य लोक तो हिमालय जमीनदोस्त करण्यास एका पायावर तयार होतील. त्यासाठी प्राणार्पण करतील'. हा महामानवाचा आत्मविश्वास खरा ठरविण्यासाठी संघटना उभ्या राहिल्या. चळवळीला नव संजीवनी मिळाली. चळवळीला किंवा संघटनेला योग्य दिशा मिळावी म्हणून विचारवंत प्रतिभावंताकडून विचारांची अभिव्यक्ती होऊ लागली. 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व' या त्रयीवर उभारलेल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, न्याय, हक्काच्या राष्ट्रीय संवेदनेचा जन्म महामानवाच्या नेतृत्वाखाली झाला.

**- प्रा. राजेंद्र खंदारे.**
सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास घागर मोर्चा काढणार : चंदनशिवे

## विस्कळीत पाणीपुरवठ्याच्या निषेधार्थ महापालिकेसमोर मटका फोड आंदोलन

सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहरातील विस्कळीत पाणीपुरवठ्याच्या निषेधार्थ माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी मटका फोड आंदोलन करण्यात आले. विस्कळीत पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास महापालिकेवर घागरी मोर्चा काढणार असा इशारा चंदनशिवे यांनी यावेळी दिला. आनंद चंदनशिवे यांनी आपल्या कार्यकर्त्यांच्या समवेत पाणी द्या पाणी द्या सोलापूर शहराला पाणी द्या नाहीतर खुर्च्या खाली करा असे घोषणा देत मटका फोड आंदोलन केले.



सोलापूर शहरातील विस्कळीत पाणीपुरवठ्यामुळे सोलापूर शहरातल्या नागरिकांना गेल्या अनेक महिन्यापासून त्रास होत आहे. सोलापूर महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाकडून समन्वयाचा अभाव असल्यामुळे सोलापूरच्या नागरिकांचे हाल होत आहेत. सध्या आंबेडकर जयंती, रमजान ईद, अक्षय्य तृतीया आदी मोठे सण आले आहेत. अशा सणासुदीच्या काळातही पाणीपुरवठा विस्कळीत होणे दुर्दैवाचे आहे.

पाणीपुरवठा विभाग व सोलापूरचे विद्युत अधिकारी व तसेच पुणे विभागातील विद्युत विभागाचे अधिकारी, जिल्हाधिकारी सोलापूर व पाटबंधारे विभागाने समन्वय करून सोलापूरचा पाणीपुरवठा विस्कळीत होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी या कमिटीच्या माध्यमातून करण्यात यावी अशी मागणी करत चंदनशिवे यांनी सोलापूर शहराचा समांतर जलवाहिनी उजनी ते सोलापूर हे काम तातडीने हाती घेणे काळाची गरज असल्याचे सांगितले.

सोलापूर शहरातल्या नागरिकांच्या आरोग्याच्या याबाबत सोलापूर महानगरपालिका आयुक्त शितल तेली उगले यांना आनंद चंदनशिवे यांच्या वतीने निवेदन देण्यात आले. त्याचप्रमाणे सोलापूर शहराचा पाणीपुरवठा न झाल्यास आंदोलन करावे लागेल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. यावेळी माजी नगरसेवक गणेश पुजारी, श्रीमंत जाधव सुहास सावंत, गौतम चंदनशिवे, अविनाश भडकुंबे, चंद्रकांत सोनवणे, हृदयनाथ मोकाशी यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## आयुक्तांकडून उजनी धरणावर केवळ फोटोसेशन श्रीदेवी फुलारे यांची टीका



सध्या महापालिकेवर प्रशासन आहे आणि उजनी धरण भरलेले असून सुद्धा सोलपुरातील जनतेचे पाण्यावाचून बेहाल होत आहे. पाच दिवसात पाणी मिळत आहे. दुसरीकडे धरण उशाला आणि कोरड सोलापूरकरांच्या घशाला अशी परिस्थिती असताना मनपा आयुक्त शितल तेली उगले यांचे मात्र उजनी धरणावर केवळ फोटोसेशन केल्याची टीका माजी नगरसेविका श्रीदेवी फुलारे यांनी केली.

सोलापूर शहराला पाच दिवसाला एकदा येत आहे. सणासुदीचे दिवस आहेत. आता १४ तारखेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आहे व रमजान महिना सुरु आहे , तरी लवकरात लवकर याचे नियोजन करा अन्यथा येणाऱ्या भविष्य काळात मोठ्या प्रमाणात महानगरपालिकेवर भव्य असा मोर्चा काढण्यात येईल असा इशारा माजी नगरसेविका श्रीदेवी जॉन फुलारे यांनी दिला.

## माळशिरस तालुका युवा सेनेच्या वतीने अनोखे आंदोलन

### चंद्रकांत पाटलाचा केला तेल लावून निषेध




सुराज्य/अकलूज

भाजपाचे चंद्रकांत पाटील यांनी जे बेताल वक्तव्य केलेल आहे की बाबरी मशीद बाळासाहेब ठाकरे आणि शिवसैनिकांनी पाडली नाही या वक्तव्यामुळे शिवसैनिका मधे प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे म्हणून युवा सेना माळशिरस तालुक्याच्या वतीने या घटनेच्या निषेधार्थ चंद्रकांत पाटलांच्या डोक्यावर खोबरेल तेल ओतून त्यांचं डोकं शांत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. इथून पुढच्या काळात ते असेच बेताल वक्तव्य करत राहिले तर चंद्रकांत पाटलांना सोलापूर जिल्ह्यात फिरू देणार नाही असा इशारा युवासेना जिल्हाप्रमुख गणेश इंगळे यांनी दिला आहे.यावेळी युवा सेना उपतालुका प्रमुख दत्ता साळुंखे युवा सेना अकलूज शहर प्रमुख शेखर खिलारे रमेश काकडे मिलिंद मोरे अप्पा महाडिक प्रशांत पवार शहाजी इंगळे विकास भोई रोहित इंगळे अविनाश भोई अक्षय पराडे शुभम भोई रामभाऊ इंगळे सचिन ताटे सचिन भोई नवनाथ इंगळे दीपक ताटे सचिन इंगळे सिधू गायकवाड लाव्हा पराडे आदी कार्यकर्ते मान्यवर उपस्थित होते.


## विद्यापीठामधील बँकिंग क्षेत्रासाठी ३२ विद्यार्थ्यांची निवड




सुराज्य/सोलापूर

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत वाणिज्य व व्यवस्थापन संकुल इन्स्टिट्यूट ऑफ प्रोफेशनल बँकिंग कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने बँकिंग क्षेत्रातील करिअरच्या संधीकरिता प्लेसमेंट ड्राईव्ह घेण्यात आला. कोरोनानंतर पहिल्यांदाच विद्यापीठमध्ये हा कॅम्पस घेण्यात आला. या ड्राईव्हमध्ये जवळपास ३२ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

सदर प्लेसमेंट ड्राईव्ह यशस्वीपणे करण्याकरीता संकुलाच्या संचालक तथा कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी मार्गदर्शन केले. तर या ड्राईव्हचे प्लेसमेंट ऑफिसर डॉ. महानंदा बनसोडे यांनी पाहीले. या ड्राईव्हकरीता स्वेरी कॉलेज पंढरपूर, सोलापूर विद्यापीठ अंतर्गत विविध संकुले, तसेच दयानंद महाविद्यालय, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, वि.गु.शिवदारे महाविद्यालय, के. पी. मंगळवेढेकर इन्स्टिटयूट, लोकमंगल महाविद्यालयातून १२४ विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या.दरम्यान, १२४ विद्यार्थ्यांमधून ३२ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांना बँकिंग ऑपरेशन्स, बँकिंग सेवा विक्री तसेच बँकिंग प्रशासन आदी क्षेत्रांमध्ये संधी मिळणार आहे. या ड्राईव्हच्या सुरुवातीला इन्स्टिट्यूट ऑफ प्रोफेशनल बँकिंगचे डायरेक्टर विवेक राजमाने, त्यांचे सहकारी प्रणव कापसे यांनी विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रातील करिअरच्या संधी याबद्दल मार्गदर्शन केले.




## नागणसूर येथील प्रचंडे प्रशालेत आधार अपडेट सेवा शिबीर

सुराज्य/अक्कलकोट

नागणसुर येथील एच, जी,प्रचंडे माध्य,व उच्च माध्यमिक प्रशालेत आधार अपडेट सेवा शिबीर घेण्यात आले. प्रशालेतील इयत्ता५वी ते १२वी कन्नड व मराठी माध्यमाच्या विध्यार्थ्यांचे आधार अपडेट शिबीर घेऊन आधार लिंक करून घेण्यात आले.

जन्म तारखेचा दाखला अत्यावश्यक केलेला आहे,शाळेचा बोनाफाईड सर्टिफिकेट व शाळा सोडल्याचा दाखला रद्द केलेले आहे,नावात बद्दल करायचे असेल तर लोकप्रतिनिधी व राजपत्रित अधिकारी यांचे प्रमाणपत्र ग्राहय धरत होते,हे सर्व रद्द केल्याने विध्यार्थ्यांना नाहक त्रास होतो आहे,पूर्वीप्रमाणे कागदोपत्र घेतल्यास सोयीस्कर होईल,अशी विध्यार्थ्यांचे मागणी आहे,याप्रसंगी प्रशालेच्या प्राचार्य सिद्धाराम सोलापुरे,जेष्ठ शिक्षक शंकर व्हनमाने संजयकुमार गंगदे,सोमशेखर कळसगोंडा, प्रा,प्रशांत नागुरे,बसवराज ,धनशेट्टी आदींनी उपस्थित होते, हे शिबीर यशस्वी करण्यासाठी नीलकंठ दरगोंडा, चनवीर कल्याण,थावरू चव्हाण,विश्वनाथ वाघमोडे,विश्वनाथ तळवार,माणिक बिराजदार, सागर पोतदार आदींनी परिश्रम घेतले, सदर शिबिरास शिक्षण विस्तार अधिकारी भीमाशंकर वाले,केंद्रप्रमुख गुरुनाथ नरुणे भेट देऊन पाहणी केली.

## ठाकूर सावदेकर विडी कारखाना व्यवस्थापनावर कारवाई करा

### महिला बिडी कामगारांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

सुराज्य/सोलापूर

ठाकूर सावदेकर विडी कंपनीतील कर्मचारी व कामगारांचे समस्या सोडविण्याबाबत कारखाना प्रशासन कोणताही निर्णय घेत नाही त्यामुळे कामगार अनेक दिवसापासून आंदोलन चालू आहे. हा प्रश्न जिल्हाप्रशासनाच्या वतीने निकाली काढवा अन्यथा सर्व महिला कामगारांना घेऊन पोलिस आयुक्तांना घेरावा घालू असा इशारा कृती समितीच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदनाच्या माध्यमातून दिला आहे. ठाकूर सावदेकर विडी कंपनीचे व्यवस्थापन व मालक कामगाराचे प्रश्न मान्य करत नाही उलट कामगारांचे प्रश्न सोडविणे ऐवजी प्रश्न सुटू नये असे प्रयत्न करीत आहेत त्यामुळे बिडी कामगार बचाव संयुक्त कृती समितीच्या वतीने जिल्हाधिकारी यांनी लवकरात लक्ष घालून कामगाराचा विषय निकाली काढवा अशी मागणी कृती समितीचे निमंत्रक विष्णू कारमपुरी, उपाध्यक्ष श्रीधर गुडेली कार्याध्यक्ष सायबन्ना तेगेल्ली यांच्या नेतृत्वाखाली महिला विडी कामगारांच्या शिष्टमंडळाद्वारे देण्यात आले.कंपनीमध्ये विडी कामगार जवळपास २ हजार महिला बिडी कामगार काम करत आहेत. मानसिक त्रासामुळे नोकरवर्ग व कामगार चे गेल्या एक महिन्यापासून कामगार आयुक्त यांच्याकडे चर्चा होऊन देखील त्यांना न्याय न मिळाल्याने सहाय्यक कामगार आयुक्त यांचे आदेश देखिल व्यवस्थापनाने फेटाळून लावले आहेत. यामुळे काम बंद आंदोलनाचा इशारा दिला होता कारखाना प्रशासनाच्या वतीने दखल घेतली नाही त्यामुळे कामागाराचे काम बंद आंदोलन चालू आहे.कामगारांचा बंद काळातील मजुरी द्यावी. अथवा सर्व राजिनामे मंजूर करून सर्व कामगारांना नुकसान भरपाई द्यावी अन्यथा १५ एप्रिल पासून तीव्र आंदोलन करण्याचा इशारादिला आहे. यावेळी अंबन्ना कोळी, प्रभाकर बाबानगरे, चंद्रकला सुरवसे ,गुरुनाथ कोळी, विठ्ठल कुराडकर ,पद्मा ध्यानपल्ली, उमाबाई भैरी, रेखा आडकि, यांच्यासह विडी कामगार महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्ह्यातील सात तहसीलदारांच्या बदल्या अमोल कुंभार यांचे सोलापुरातच पुनर्वसन

सुराज्य/सोलापूर

राज्याच्या महसूल विभागाने तहसीलदारांच्या बदल्या केल्या असून यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील सात तहसीलदारांचा समावेश आहे. दक्षिण सोलापूरचे तहसीलदार अमोल कुंभार यांचे सोलापुरातच पुनर्वसन' करण्यात आले असून उत्तर सोलापूरचे तहसीलदार जयवंत पाटील यांची मात्र थेट नागपूरला बदली झाली आहे. त्यांची नियुक्ती नागपूर शहर संगांयो' तहसीलदारपदी झाली आहे.

याबरोबरच माढ्याचे तहसीलदार राजेश चव्हाण, मंगळवेढ्याचे तहसीलदार स्वप्निल रावडे, करमाळ्याचे तहसीलदार समीर माने, जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार प्रियांका ढोले, पुनर्वसन विभागातील अभिजित जाधव यांच्या बदल्या झाल्या आहेत.

पुनर्वसन विभागातील जाधव यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर दक्षिणचे तहसीलदार कुंभार यांची वर्णी लागली आहे. दक्षिणसाठी मात्र अद्याप कुणाचीही नियुक्ती करण्यात आली नाही. उत्तर सोलापूरसाठी पाटील यांच्या जागी बुलडाण्याहून सैपन नदाफ हे बदलून येत आहेत. माढ्याचे तहसीलदार चव्हाण यांची कोल्हापूर जिल्हयातील चंदगड येथे बदली झाली असून त्यांच्या जागी चंदगड येथून विनोद रणावरे हे येत आहेत. मंगळवेढ्याचे रावडे यांची कोल्हापूर जिल्हयातील करवीर येथे बदली झाली असून त्यांच्या जागी अमरावती येथून मदन जाधव हे बदलून येत आहेत. करमाळ्याचे तहसीलदार माने यांची कोल्हापूर जिल्हयातील आजरा येथे बदली झाली आहे. करमाळ्यासाठीही अद्याप कुणाची नियुक्ती करण्यात आली नाही. जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार ढोले यांची मुंबईला बदली झाली असून त्यांच्या जागी पिंपरी चिंचवड येथून गीता गायकवाड या येत आहेत.

## जवळा येथे घराला आग

सांगोला : जवळा येथील शेखवस्ती परिसरामध्ये रहिवासी असलेले संभाजी मसु साळुंखे व संजय संभाजी साळुंखे यांचे अचानक राहत्या घरी आग लागून राहते घर जळून खाक झाले. ही सदर घटना सकाळी ०९:०० च्या सुमारास घडली. या गावांमध्ये राहणारे हे साळुंखे कुटुंबीय आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी दररोज रोजंदारीवर जातात. अतिशय गरीब असलेले कुटुंब हे आजही नेहमीप्रमाणे रोजंदारीने कामाला गेले होते, यावेळी अचानक घराला आग लागल्याने ही दुर्दैवी घटना घडली.

सदर दुर्दैवी घटने विषयी माहिती मिळताच महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष मा.आ. दिपकआबा साळुंखे पाटील यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन सर्व संसारोपयोगी साहित्य, घरातील सर्व सदस्यांना कपडे, अन्नधान्य यांची तात्काळ मदत त्यांनी यावेळी केली.

## स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी तहसीलदार, पोलिसांची आता धडक मोहीम

### सोनोग्राफी सेंटर्सची होणार तपासणी; अप्पर जिल्हाधिकारी ठोंबरे यांचे आदेश

सुराज्य/सोलापूर

स्त्रीभृणहत्या रोखण्यासाठी व मुलींचा जन्मदर वाढण्यासाठी जिल्ह्यातील सोनोग्राफि सेंटर्सची कडक तपासणी करावी. तसेच, तहसीलदार, पोलीस व समितीचे सदस्य यांनी धडक मोहीम राबवावी. यासाठी जिल्हा प्रशासनाचे संपूर्ण सहकार्य राहील असे आदेश अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी दिले.

गर्भधारणा व प्रसूतिपूर्व निदान व तंत्रज्ञान जिल्हा दक्षता समितीच्या बैठकि झाली या बैठकित आढवा घेताना ते बोलत होते. अप्पर जिल्हाधिकारी यांच्या दालनात झालेल्या या बैठकिस जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय पाटील, विधी समुपदेशक डॉ. पल्लवी भोला, पीसीपीएनडीटी समन्वयक शमा डबीर आदिंसह समितीचे सदस्य उपस्थित होते.

गत आर्थिक वर्षात २५ नवीन सोनोग्राफि सेंटर्स व २० मशीन खरेदीस मान्यता देण्यात आली आहे. तर जिल्ह्यातील २१९ सोनोग्राफि व ८२ एमटीपी सेंटर्सची तपासणी करण्यात आली आहे. मात्र, स्त्रीभृण हत्या रोखण्यासाठी व मुलींचा जन्मदर वाढण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्याची कडक अंमलबजावणी करावी. तसेच सोनोग्राफि सेंटर्स तपासणीसाठी धडक मोहीम राबवण्याचे आदेश देखिल यावेळी दिले.

#### सांगोल्यात मुलीचा जन्मदर अधिक

सांगोला तालुक्यात सन २०२२ मध्ये दर हजारी मुलांमागे मुलींचा जन्मदर १ हजार ११९ असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. दर हजारी मुलांमागे सोलापूर महानगपालिका हद्दीत मुलींचा जन्मदर ९७८ तर जिल्ह्यातील ग्रामीण भागात मुलींचा सरासरी जन्मदर ९४५ आहे. अन्य तालुक्यांनी सांगोल्याचा आदर्श घेऊन मुलींची संख्या वाढण्यासाठी प्रयत्न करावेत अशा सूचना अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या.

# भगवान परशुराम जयंतीनिमित्त सोलापुरात विविध कार्यक्रम



सुराज्य/सोलापूर

**शनिवार दि. २२ एप्रिल रोजी अक्षय तृतीया या दिवशी भगवान परशुराम यांची जयंती आहे. या निमित्ताने भगवान परशुराम जयंती महोत्सव समितीतर्फे विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आला आहे. यामध्ये मिरवणूक, भगवान परशुरामांच्या मूर्तीचे पूजन आणि परशुराम चषक क्रिकेट स्पर्धेचा समावेश आहे, अशी माहिती भगवान परशुराम जयंती महोत्सव समितीचे निमंत्रक नितीन कुलकर्णी यांनी बुधवारी पत्रकारांशी बोलताना दिली.**

परशुराम जयंती महोत्सव उत्तमरितीने साजरी व्हावा यासाठी उत्सव समितीचे अध्यक्ष म्हणून राजन कामत, उपाध्यक्ष म्हणून सुधीर कुलकर्णी, कार्याध्यक्ष म्हणून अमर कुलकर्णी आणि महिला प्रतिनिधी म्हणून आश्लेषा निपुणगे यांची निवड करण्यात आली आहे.

२२ रोजी दुपारी ४ वाजता राजवाडे चौकातून भगवान परशुरामांच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात येणार आहे. ही मिरवणूक नवी पेठ, मेकॅनिक चौक, सरस्वती चौकमार्गे जाऊन चार पुतळा येथे विसर्जित होईल. त्याच ठिकाणी सायंकाळी साडेसहा वाजता भगवान परशुरामांच्या मूर्तीची ५१ ब्रह्मवृंदांच्या उपस्थितीत आणि मंत्रोच्चारात प्रतिष्ठापना होऊन पूजन करण्यात येईल. त्यानंतर रात्री साडेनऊ वाजेपर्यंत सदरची मूर्ती त्याच ठिकाणी भाविकांना दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे, असे नितीन कुलकर्णी यांनी सांगितले. चार पुतळ्याजवळील मूर्ती पूजनासाठी सोलापूर शहरातील सर्व समाजातील नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहनही नितीन कुलकर्णी यांनी केले आहे.

सोलापूरच्या भगवान परशुराम जयंती महोत्सव समितीस पुण्याचे परशुराम भक्त सुनील गानू यांनी साडेचार फुटी भगवान परशुरामांची मूर्ती भेट दिली आहे. तीच मूर्ती मिरवणुकीत आणि पूजास्थानी असणार आहे. या पत्रकार परिषदेला नितीन कुलकर्णी, आश्लेषा निपुणगे, अमर कुलकर्णी, राजन कामत, जयतीर्थ पडगानुर, डॉ. गिरीष कुमठेकर, राम तडवळकर, वामन कुलकर्णी, मीना चाटी आदी उपस्थित होते.

### परशुराम चषक क्रिकेट स्पर्धा

भगवान परशुराम जयंतीच्या निमित्ताने यावर्षी जयंती महोत्सव समितीतर्फे परशुराम चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित केली आहे. येत्या १४ आणि १६ एप्रिल रोजी या स्पर्धा होत आहेत. स्पर्धेत एकूण आठ संघ सहभागी झाले आहेत. १४ एप्रिलला आठ संघांमध्ये प्राथमिक फेरी होईल, त्यानंतर १६ एप्रिल रोजी उपांत्य सामने आणि अंतिम सामना होईल.



## कोंडी सोसायटीच्या चेअरमनपदी शिंदे, व्हाईस चेअरमनपदी पाटील

सुराज्य/उत्तर सोलापूर : कोंडी विविध विकास कार्यकारी सोसायटी कोंडीच्या चेअरमनपदी रावसाहेब नारायण शिंदे, व्हाईस चेअरमनपदी बाळकृष्ण हनुमंत पाटील यांची बिनविरोध निवड निवडणूक निर्णय अधिकारी पी. आर. संकद, अनिल मदने, सचिन म्हमाणे यांच्या उपस्थितीत बिनविरोध करण्यात आली. यावेळी शिवसेना बाळासाहेब ठाकरे उपजिल्हा प्रमुख,माजी उपसरपंच विक्रांत काकडे, पृथ्वीराज माने युवा मंचाचे सदस्य ओंकार शिंदे, ग्रामपंचायत सदस्य गणपत पाटील, सोसायटी क्र १ चे चेअरमन ज्योती भोसले, व्हाईस चेअरमन चंद्रकांत निळ सदस्य सदाशिव गायकवाड, नामदेव भोसले, हणमंत भोसले, चंद्रकांत नीळ, जयराम भोसले, मारुती भोसले, रघुनाथ शहापुरकर, दत्ता पाटील, सुमन भोसले, सुवर्णा शिंदे, आबासो बोबडे, रवींद्र वाघमारे, बब्रुवान वाघमारे, कुंडलीक भोसले, जालिंदर निंबाळकर, हरी भोसले, उद्धव पाटील, रमेश शिंदे, गोविंद पाटील, राजेंद्र राऊत, बाळासो वाघमारे, महादेव भोसले, वैभव बोबडे, सुशांत नीळ, लक्ष्मण भोसले, निवृत्ती भोसले, नवनाथ नीळ, संजय नीळ उपस्थित होते.

## शिवाजी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय प्रकल्प स्पर्धेत यश

सुराज्य/सांगोला : पुणे येथील अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय प्रकल्प स्पर्धेत सांगोला येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजच्या मेकॅनिकल विभागातील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक मिळवून कॉलेजचा नावलौकिक वाढविला आहे. मेकॅनिकल विभागातील अंतिम वर्षातील साईराज गायकवाड-पाटील, शैलेश केदार, प्राजक्ता पवार, बसवराज डूम व चरण पवार या विद्यार्थ्यांनी या प्रकल्प स्पर्धेत आपला प्रकल्प सादर करून स्पर्धेच्या पर्यवेक्षकांना प्रकल्पाचे फायदे पटवून दिले. ह्या प्रकल्पांतर्गत तयार करण्यात आलेले यंत्र महामार्गावरील दुभाजकावर स्थापित करून, महामार्गावरील येणाऱ्या जाणाऱ्या वाहनाच्या गतीमुळे या यंत्रातील पाते गोलाकार फिरून निर्माण होणारी वायु ऊर्जेचे रूपांतर इलेक्ट्रिक ऊर्जेमध्ये करण्यात या विद्यार्थ्यांना यश आले आहे. यामध्ये निर्माण झालेली ऊर्जा स्टोअर करून इलेक्ट्रिक वाहनासाठी भविष्यात तिचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येऊन पारंपारिक ऊर्जा संसाधने यांना ती पर्याय ठरू शकते.

शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांच्यामध्ये संशोधन वृत्ती वाढीस लागावी यासाठी त्यांना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. येथे असणाऱ्या सुसज्ज प्रयोगशाळा, सर्व साधनांनी युक्त वर्कशॉप तसेच संशोधन करण्यासाठी आवश्यक असणारे मार्गदर्शन व प्रोत्साहन देण्यात येत असल्यामुळे या कॉलेजमधील अनेक विद्यार्थी नवनवीन समाज उपयोगी प्रकल्प तयार करत असून त्याचा समाजासाठी फायदा होत आहे. विद्यार्थ्यांना हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शक प्रा. जी. एस. भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल त्यांचे संस्थेचे अध्यक्ष बाबूराव गायकवाड, ज्येष्ठ विश्वस्त श्री. एम. आर. गायकवाड व सर्व संचालक मंडळ यांनी अभिनंदन केले. संस्थेचे विश्वस्त डॉ. यशोदीप गायकवाड यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. ए. देशमुख, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस व संशोधनास शुभेच्छा दिल्या.

## मो. आयाज यांच्या माहे रमजान आया अल्बमचे प्रकाशन




सुराज्य/सोलापूर : नुकतेच पवित्र रमजान निमित्त महाराष्ट्राचे महागायक विजेते तथा सोलापूर सुरमणी मोहम्मद अयाज यांच्या आवाजात रमजान की रहेमते हा इस्लामिक डिव्होशनल अल्बम झी म्युझिक मधुन प्रकाशित करण्यात आला. माहे रमजान आया हरसू करम का साया, किस्मत जगी मोमीनों की बख्शीश का पयाम लाया माहे रमजान आया, या गीतांचे गायक, गीतकार, संगीतकार मोहंम्मद अयाज असुन संगीत संयोजन साहीर नदाफ यांनी केले. याचे ध्वनीमुद्रण प्रकाश माने केले आहे. अयाज आजपर्यंत अशा अनेक गाणी वेगवेगळ्या गायकां सोबत गायलेले आहेत.यामध्ये उषा मंगेशकर, अनुराधा पौडवाल, सुरेश वाडकर, अनुप जलोटा, हेमलता, साधना सरगम, वर्षा उसगावकर, सपना अवस्थी अशा अनेक दिग्गज गायक कलावंतासह गाऊन सोलापूरचा नावलौकिक केलेला आहे. तसेच संगीत क्षेत्रात जागतिक नामांकन व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डने मोहम्मद अयाज यांना सन्मानित केले. अशा सोलापुरी कलावंताच कौतुक सोलापूरकर सदैव करत आलेले आहेत. हे गीत नक्कीच रसिकांना आवडेल, अशी भावना अयाज यांनी व्यक्त केली.

## विविध सामाजिक उपक्रमांनी महात्मा फुले जयंती साजरी

सुराज्य/पिलीव : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे विविध उपक्रमांनी क्रांती सूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यामध्ये सुरुवातीला सकाळी बसस्थानकावर महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी पिलीवचे सरपंच नितीन मोहिते, शिवसेनेचे अशोक भाऊ घोंगडे, राहुल मदने, संग्राम पाटील, गोविंद भैस,अविनाश जेऊरकर, संजय आर्वे, कुमार भैस, राजेंद्रसिंग जामदार, संतोष पिसे,विजय पिसे, हनुमंत पिसे, संजय जाधव, मोहसीन शेख, भैया जामदार, दादासाहेब शिंगाडे, राजेंद्र करांडे, उमेश देशमुख यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते. यानंतर पिलीव बाजारपेठेतून समाज बांधवांच्यावतीने रॅलीचे आयोजन करण्यात आले. नंतर पिलीव ग्रामपंचायतीच्यावतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच यावेळी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. यावेळी ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सायंकाळी सात वाजता पिलीव बसस्थानकावरुन महात्मा फुले यांच्या प्रतिमेची बाजारपेठेतून मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीचे उद्‌घाटन माजी सभापती संग्रामसिंह जहागिरदार, जि. प. सदस्य गणेशदादा पाटील, सरपंच नितीन मोहिते व इतर समाजबांधवांच्या उपस्थितीत काढण्यात आली.

## जागरण गोंधळ व अन्नदानाने श्री अर्धनारीनटेश्वर यात्रेची सांगता

सुराज्य/वेळापूर

येथील ग्रामदैवत श्री अर्धनारीनटेश्वर यात्रेची सांगता जागरण गोंधळ व मोहिते-पाटील परिवाराने केलेल्या अन्नदानाने झाली.

हेमाडपंथी जागतिक लेण असलेल्या श्री अर्धनारीनटेश्वर यात्रेस चैत्री पाडव्यापासून प्रारंभ झाला. चैत्र शुध्द पंचमीस देवाच्या हळदीचा कार्यक्रम पार पडला. अष्टमीला रात्री १२ वाजता देवाचा विवाह सोहळा पार पडला. चैत्र वद्य प्रतिपदेला विद्युत रोषणाई व फटाक्यांच्या आतषबाजीत रात्री १२ वाजता देवाच्या साड्याचा व पालखी मिरवणुकीचा कार्यक्रम पार पडला. या मिरवणुकीत गावातील विविध समाजाच्या मानाच्या कावडी सहभागी झाल्या होत्या.

गुरुवार दि.१३ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता अकलूजचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी देवश्रीदेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते श्री अर्धनारीनटेश्वरास संपूर्ण पोशाख करण्यात आला व आरती करण्यात आली. यावेळी शिवशंकर बझारच्या चेअरमन स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील उपस्थित होत्या. सकाळी १० वाजता धानोरेचे माजी सरपंच जीवन जानकर व त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. स्नेहल जानकर यांच्या



हस्ते श्री सत्यनारायण महापूजा करण्यात आली. यावेळी सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजी चव्हाण, यात्रा कमिटी अध्यक्ष मिलींद सरतापे आदी कार्याध्यक्ष विनायक माने, खजिनदार जावेद मुलाणी, उपाध्यक्ष धनंजय शिवपुजे उपस्थित होते. सायंकाळी ७ वाजता तुकाराम वाघे व पार्टी यांचा जागरण गोंधळाचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर मोहिते-पाटील परिवाराच्यावतीने अन्नदान करण्यात आले. या सोहळ्याचे पौरोहित्य महेश गुरव, योगेश गुरव, जगदीश गुरव, विवेक जोशी, महेश स्वामी आदींनी केले.

## उजनीच्या पाणी साठ्यात झपाट्याने घट, मायनस मध्ये जाण्याची शक्यता

सोलापूर- सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी असलेल्या उजनी धरणातील जलसाठा झपाट्याने कमी होत असून पावसाळ्यात १२३ टीएमसी एवढा प्रचंड पाणीसाठा असलेले धरण लवकरच मायनस मध्ये जाण्याची शक्यता आहे. याचा फटका नदीकाठच्या शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर बसणार असून शेतकऱ्यांना विद्युत पंप खाली सरकवताना मोठी कसरत करावी लागत आहे. यामुळे त्यांच्यावर पाईप व केबलचा आर्थिक भुर्दंड पडत असून भविष्यात यामध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.



### अनाधिकृतपणे उपसा करणाऱ्यांवर कारवाई करा

सोलापूर शहराला पिण्याच्या नावाखाली सोडलेले पाणी कर्नाटकातील शेतकरी अनाधिकृतपणे शेतीसाठी उपसा करीत आहेत. यामुळे औज बंधाऱ्यातील पाणी झपाट्याने कमी होत आहे. या संदर्भात प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून केली जात आहे.

आतापर्यंत उन्हाळ्यात शेतीसाठी दोन आवर्तने सोडण्यात येत होती, परंतु चालू वर्षात तीन आवर्तने सोडण्याचा निर्णय झाला आहे. मे महिन्यात जर सोलापूरसाठी नदीत पाणी सोडले तर धरण मायनस मध्ये जाणार आहे. याचा फटका नदीकाठच्या शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर बसणार आहे.

सध्या उजनी धरणातून सीना माढा उपसा सिंचन योजनेद्वारे ३३३, दहिगाव उपसा सिंचन योजनेद्वारे १२०, बोगद्याद्वारे ८१० तर कालव्याद्वारे तीन हजार क्यूसेक एवढे पाणी प्रतिदिन सोडले जात आहे. यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज स्कायमेट या संस्थांनी वर्तवलेला आहे. सरकारने याचा गांभीर्याने विचार करून आतापासूनच पीक नियोजन आणि धरणातील पाणीसाठ्याचे पिण्यासाठी व शेतीसाठी काटेकोर नियोजन करण्याची गरज आहे. शिवाय दुष्काळी परिस्थितीत करावयाच्या कामाचा आराखडा ही तयार करणे गरजेचे आहे.

## केळी उत्पादक शेतकरी संघातर्फे रविवारी राज्यस्तरीय केळी परिषद

सुराज्य/सोलापूर

केळी उत्पादक शेतकरी संघ महाराष्ट्र राज्यच्यावतीने रविवार दि. २३ एप्रिल २०२३ रोजी सकाळी ११ वाजता सावदा (बनाना सिटी) ता. रावेर जि. जळगाव येथे प्रभाकर महाजन बहुद्देशीय सभागृह आयोजित करण्यात आल्याची माहिती या संघाचे संस्थापक अध्यक्ष किरण चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली.

केळी शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची आजची स्थिती बरीचशी नाजूक असून अवकाळी पाऊस, गारा, सि. एम.व्ही. वायरस, बोगस रोपे, बोगस औषधे तसेच विमा कंपन्यांनी व व्यापाऱ्यांनी चालवलेली शेतकऱ्यांची पिळवणूक या समस्यांवर उपाय योजना करण्यासाठी केळी शेतीतील विचारवंत शेतकरीपूरक उद्योजकांनी एकत्रित येऊन या परिस्थितीवर चर्चा करण्यात येणार आहे. ठोस उपाययोजना सुचवण्याची गरज निर्माण झाली आहे. या गरजेची पूर्तता करण्यासाठीच केळी उत्पादक संघाने राज्यस्तरीय केळी परिषदेचे आयोजन केले आहे. आधुनिक केळीतील तंत्रज्ञान विषयाचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. डॉ. प्रशांत नाईकवाडी हे केळी पिक रोग नियंत्रण व सेंद्रीय शेती आणि राज ईन शाईनचे मार्केटिंग मॅनेजर नंदलाल वसेकर यांचे निर्यातक्षम केळी व सूक्ष्म अन्नद्रव केळीचे महत्व याविषयी मार्गदर्शन करणार आहेत. महाराष्ट्रातील सर्व केळी उत्पादक शेतकऱ्यांनी सदर केळी परिषदेस उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थापक अध्यक्ष किरण चव्हाण यांनी केले आहे.

या परिषदेत महाराष्ट्र केळीरत्न कार्य गौरव पुरस्काराने १९ उत्पादकांचा गौरव तसेच आदर्श कृषी पत्रकार पुरस्काराचे वितरण यावेळी करण्यात येणार आहे. या परिषदेस अतुल माने-पाटील, विजयसिंह गायकवाड आदी उपस्थित होते.

## ३२ मोबाईलसह पावणे चार लाखांचा मुद्देमाल हस्तगत

सुराज्य/सोलापूर : मार्केट यार्ड परिसरात थांबलेला ट्रकचालक, शेतकरी ग्राहकांचे मोबाइल चोरून, हिस्कावून नेत कमी किमतीत विकल्याप्रकरणी दोन हमालांना पोलिसांनी अटक केली आहे. अक्षय सीताराम कांबळे (वय-२२,रा.भारतरत्न, इंदिरानगर),इम्रान शब्बीर इनामदार (वय-२४,रा. भारतरत्न, इंदिरानगर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींचे नाव आहे.

गुरुवारी एका ट्रकचालकाच्या हातून दोन दुचाकिस्वारांनी दमदाटी करत मोबाइल हिस्कावून नेल्याचा गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यांचा तपास करताना जोडभावी पोलिसांनी आरोपींची माहिती मिळाली.या माहितीच्या आधारे आरोपींना पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतले. विचारपूस केल्यानंतर आरोपींनी चोरी केल्याचे कबूल केले. दरम्यान,त्यांच्याकडून ३ लाख ७७ हजार रुपयांचे ३२ मोबाइल जप्त करण्यात आले आहे,दरम्यान,आरोपी हे सराईत गुन्हेगार आहे.

## जिल्हा कॉँग्रेस कमिटीतर्फे शनिवारपासून जयभारत सत्याग्रह

### दक्षिण सोलापूर तालुक्यातून होणार सुरूवात

सुराज्य/सोलापूर

कॉँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ.धवलसिंह प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली शनिवारपासून जय भारत सत्याग्रह सभांचे आयोजन करण्या आल्याची माहिती देखरेख समिती व नियंत्रण कक्ष प्रमुख तथा वरिष्ठ उपाध्यक्ष विजयकुमार हत्तुरे यांनी दिली.





खासदार राहुलजी गांधी यांच्यावर चुकीचा आरोप लावून त्यांची खासदारकी रद्द केल्याच्या निषेधार्थ खालील तालुक्यात सोलापूर जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ.धवलसिंह प्रतापसिंह मोहिते- पाटील यांच्या नेतृत्वाखाली जय भारत सत्याग्रह सभा (कॉर्नर सभा) आंदोलन,मोर्चा घेण्यात येणार आहेत.

दक्षिण सोलापूर आणि उत्तर सोलापूरमध्ये शनिवार दिनांक १५ एप्रिलपासून याची सुरूवात होत आहे. सकाळी ११ वाजता मंद्रूप व दुपारी ४:०० वाजता नान्नज, रविवार दिनांक १६ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता सांगोला व दुपारी ४ वाजता हुन्नूर, सोमवार १७ एप्रिल रोजी सकाळी ११:०० वाजता मोहोळ तहसील कार्यालयवर भव्य मोर्चा, दुपारी ४ वाजता पंढरपूर शहर (राष्ट्रसंत कैकाडी महाराज मठ) व सायंकाळी ६:०० वाजता भोसे, मंगळवार दिनांक १८ एप्रिल रोजी सकाळी ११ करमाळा व दुपारी ४:०० वाजता टेंभुर्णी, बुधवार दिनांक १९ एप्रिल रोजी सकाळी ११:०० वाजता माळशिरस व दुपारी ४ बार्शी, गुरुवार दिनांक २० एप्रिल रोजी सकाळी ११:०० अक्कलकोट येथे जय भारत सत्याग्रह सभा घेण्यात येणार आहेत. तरी सर्व जिल्हा पदाधिकारी फ्रंटल, सेल,विभागाचे अध्यक्ष पदाधिकारी व निरीक्षकांसह कार्यकर्त्यांनी सभेस उपस्थित रहावे व सभा,मोर्चा यशस्वी होण्याकरिता तालुका अध्यक्षांना सहकार्य करावे, असे आवाहन विजयकुमार हत्तुरे यांनी केले आहे.

## श्री स्वामी समर्थ पादुका सोहळ्याचे अक्कलकोटकडे प्रस्थान

सुराज्य/वेळापूर

**येथील श्री स्वामी समर्थ सेवा मंडळाच्या वतीने श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या १४५ व्या पुण्यतिथीनिमित्त श्रीक्षेत्र वेळापूर ते श्री क्षेत्र अक्कलकोट या श्री स्वामी समर्थ पादुका दिंडी सोहळ्याचे शुक्रवार दि. १४ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता श्रीक्षेत्र अक्कलकोटकडे प्रस्थान होत आहे. सोहळ्याचे हे १४ वे वर्ष आहे.**

चैत्र कृ. ९ शुक्रवार दि. १४ एप्रिल रोजी सायं. ५ वाजता वेळापूर विकास सोसायटीचे चेअरमन अमरसिंह माने -देशमुख व वैष्णवी माने-देशमुख या उभयतांच्या हस्ते श्रींच्या पादुकांची पूजा, अभिषेक व आरती होऊन श्रीक्षेत्र अक्कलकोटकडे प्रस्थान होईल. चैत्र कृ. १० शनिवार दि. १५ रोजी सकाळी ६ वाजता वेळापूर येथील श्री अर्धनारीनटेश्वर मंदिरात पादुका पूजन व भेट सोहळा श्रीक्षेत्र वेळापूरहून मार्गस्थ होईल. बोंडले येथे न्याहरी, पिराचीकुरोली येथे दुपारची आरती, नैवेद्य व भोजन, भंडीशेगाव येथे सायंकाळचा विसावा, इसबावी येथे सायंकाळचा दुसरा विसावा घेऊन हा सोहळा श्रीक्षेत्र पंढरपूर श्री संत ज्ञानेश्वर महाराज मठात पहिल्या मुक्कामी पोहोचेल. चैत्र कृ. ११ रविवार दि. १६ रोजी श्रीक्षेत्र पंढरपूरहून हा सोहळा पुढे मार्गस्थ होईल. देगाव येथे सकाळची न्याहरी, अजनसोंड येथे सकाळचा विसावा, सुस्ते येथे सकाळचा दुसरा विसावा घेऊन सोहळा दुपारची आरती, नैवेद्य व भोजनासाठी तारापूर येथे पोहोचेल. त्यानंतर सोहळा शिंदे मळा, वरकुटे येथे दुसऱ्या मुक्कामी पोहोचेल. चैत्र कृ. १२ सोमवार दि. १७ रोजी वरकुटेहून सोहळा पुढे मार्गस्थ होईल. कुरुल येथे सकाळचा विसावा, कामती बु. येथे न्याहरी, कामती खु. येथे दुपारची आरती, नैवेद्य व भोजन, तिऱ्हे येथे सायंकाळचा विसावा, देगाव येथे सायंकाळचा दुसरा विसावा घेऊन सोहळा श्री गणेश मंदिर सोलापूर येथे रात्रीची आरती, नैवेद्य व भोजनासाठी थांबेल.



रात्री श्री सिध्देश्वर मंदिर, सोलापूर येथे मुक्कामी पोहोचेल. चैत्र कृ. १३ मंगळवार दि. १८ रोजी श्री स्वामी समर्थ महाराज यांची १४५ वी पुण्यतिथी असून पहाटे आडत व्यापारी बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते श्रींच्या पादुकांची पूजा, अभिषेक व आरती होईल. विजयबाग अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे अध्यक्ष अमोलराजे भोसले हे सोहळ्याचे स्वागत करतील. सकाळची न्याहरी घेऊन हा सोहळा अक्कलकोट येथील समाधी मंदिर दर्शन घेऊन पुण्यतिथी उत्सवासाठी गुरुमंदिर येथे पोहोचेल. येथे दुपारची आरती, नैवेद्य व महाप्रसाद घेऊन श्री वटवृक्ष मंदिर दर्शनानंतर सोहळा परतीच्या प्रवासासाठी निघेल. सोलापूर येथे सायंकाळचा विसावा पूजा, आरती व भोजन घेऊन सोहळा रात्री श्रीक्षेत्र वेळापूर मुक्कामी पोहोचेल व पादुका सोहळ्याची सांगता होईल. श्री स्वामी समर्थ पादुका दिंडी सोहळा हा चार दिवसांचा असून हा सर्व प्रवास गाडीने आहे. ज्या स्वामी भक्तांना या सोहळ्यात सहभागी व्हायचे आहे, त्यांनी मंडळाकडे नाव नोंदणी करावी, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे यांनी केले आहे.



## वेळापूर ग्रामपंचायततर्फे आडत यांचा सत्कार

सुराज्य/वेळापूर : वेळापूर आडत मळा येथील दत्तात्रय भागवत आडत यांची महाराष्ट्र पोलीस म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा वेळापूर ग्रामपंचायतीच्यावतीने वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे व उपसरपंच तानाजीकाका चव्हाण यांच्या हस्ते दत्तात्रय भागवत आडत तसेच त्याचे आई-वडील भागवत आडत व निलाबाई आडत यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी रिपाइं माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, वेळापूर ग्रामपंचायत गटनेते संजयआबा मंडले, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, ग्रामपंचायत सदस्य हनुमंत वायदंडे, काशिनाथ आडत, मल्हारी शिंदे, महादेव म्हेत्रे, सुखदेव आडत, शंकर आडत, शिवाजी मोहिते, विश्वास वाघे, राष्ट्रवादी काँग्रेस महिला जिल्हा उपाध्यक्षा अश्विनी उमेश भानवसे, विनायक चंदनशिव, उमेश भानवसे, आबा बनसोडे, तुकाराम शिंदे, भाऊ आडत व वेळापूर ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.



## रेशन दुकानातील काळाबाजार थांबवा : मनसेचे निवेदन

सुराज्य/कुर्डूवाडी : कुर्डूवाडी शहर व ग्रामीण भागामधील रेशन दुकानदार नागरिकांच्या हक्काच्या मालाचा काळाबाजार करत असल्याची काही नागरिकांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे. त्यामुळे मनसे अध्यक्ष आकाश लांडे यांनी प्रांत अधिकारी कुर्डूवाडी यांना निवेदन देण्यात आले आहे. रेशनकार्डवर एका कुटुंबात सात व्यक्ती असतील तर पाच व्यक्तींना रेशनचा माल मिळेल, असे सांगून रेशनधारकाला वारंवार सांगितले जात आहे. मग इतर व्यक्तींचा रेशनचा माल कुठे जातो असा प्रश्न आज निर्माण होत आहे. म्हणून प्रशासनाने लवकरात लवकर काळ्या बाजार करणाऱ्या संबंधित रेशनदुकानांची चौकशी करून कारवाई करावी अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा दिला आहे. यावेळी वाहतूक सेना जिल्हा उपाध्यक्ष पांडुरंग ढेरे, टोणपे, शहर सरचिटणीस महादेव काळे, शहर उपाध्यक्ष गणेश खिलारे, शहर सचिव सचिन शेंडगे, वाहतूक सेना शहराध्यक्ष राजाभाऊ भिसे, सचिन परबत उपस्थित होते.



## युवासेना उत्तर तालुकाध्यक्षपदी आतिष गवळी यांची निवड

सुराज्य/उत्तर सोलापूर : उत्तर तालुक्यातील अकोलेकाटी येथील आतिष यल्लप्पा गवळी यांची युवासेना उत्तर तालुका प्रमुखपदी निवड करण्यात आली. सोलापूर जिल्ह्याचे संपर्कप्रमुख प्राचार्य शिवाजीराव सावंत यांच्या हस्ते शिवसेना जिल्हाप्रमुख मनिष काळजे यांच्या उपस्थितीत निवडपत्र देण्यात आले. दिलीप कोल्हे, शहरप्रमुख मनोज शेजवाल, युवासेना जिल्हाप्रमुख उमेश गायकवाड, सोशल मीडिया जिल्हाप्रमुख आशिष जेटीथोर, धीरज कापसे, रोहन डोलारे, अझहर शेख, राम रणदिवे, प्रथमेश कापुरे, स्वप्नील असवरे, सोनू कसबे, ओम कापुरे व पदाधिकारी उपस्थित होते.

## उत्तर तालुका कृषी विभागातर्फे पाककला स्पर्धा संपन्न

सुराज्य/उत्तर सोलापूर : उत्तर तालुका कृषी अधिकारी उत्तर सोलापूर व संगमेश्वर कॉलेज सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने येथील संगमेश्वर महाविद्यालयात पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. प्रा. आर. व्ही. देसाई यांच्या हस्ते उत्तर तालुका कृषी अधिकारी मनीषा मिसाळ, दिनेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत उद्‌घाटन करण्यात आले. स्पर्धेमध्ये कॉलेजच्या विद्यार्थिनी, उत्तर सोलापूर तालुक्यातील बचत गटातील महिला यांनी सहभाग घेतला होता. दिनेश क्षीरसागर यांनी तृणधान्याचे आहारातील महत्त्व याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. सदर स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ. जे. पी. दुधनी, डॉ. एन. एन. चक्रदेव यांनी पाहिले. फिजिक्स विभाग एस. एस. गावंडे, मंकृअउ सोलापूर डी. बी. क्षीरसागर, मंकृअ नान्नज के. एल. थिटे यांच्यासह कृषीविभाग कर्मचारी, कॉलेजचे विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. ए. व्ही. दिवटे यांनी केले तर उपस्थितांचे आभार कारंडे यांनी मानले.

## राष्ट्रीय लिंगायत संघ, भारततर्फे कापसे यांना बसवरत्न पुरस्कार जाहीर



सुराज्य/अक्कलकोट : येथील उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते लायन्स क्लबचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर राजशेखर कापसे यांना राष्ट्रीय लिंगायत संघ, भारत यांच्याकडून हा मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा लिंगायत समाजातील पुरस्कार सुरेश खाडे व माजी खासदार चंद्रकांत खैरे यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात येणार आहे, अशी माहिती संघाचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप वाले यांनी दिली आहे. हा कार्यक्रम सांगली येथे होणार आहे. राजशेखर कापसे यांनी औद्योगिक क्षेत्रात एक यशस्वी उद्योजक म्हणून कार्य केले आहे. सहा महसुली जिल्हे सोलापूर, सातारा, कोल्हापूर, सांगली, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व पुणे जिल्ह्यातील इंदापूर, बारामती जिल्ह्याचे लायन्स क्लबचे प्रमुख डिस्ट्रिक्ट गव्हर्नर म्हणून ते सध्या कार्यरत आहेत.

सुराज्य सोलापूर
Classified
पाहिजेत
गरजुंना कायमची कामाची व राहण्याखाण्याची सोय, लॉजमध्ये कायम राहणास कामगार पाहिजेत.
मो.9373980171
(190423)

# दुधनी शहराचा पाणी पुरवठा विस्कळीत, नेतेमंडळी मात्र निवडणुकीत व्यस्त

सुराज्य/अक्कलकोट

**दुधनी शहरात गेल्या काही दिवसापासून पाण्याचा प्रश्न अतिशय बिकट बनला असून सध्या शहरवासीयांना एक दिवसाआड तर कधी तीन-चार दिवसाआड पाणी पुरवठा सुरू आहे. नगरपालिकेकडे पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन नसल्याने शहरावर जलसंकट कोसळले आहे. याबाबत जनताही गप्प असून नेतेमंडळी मात्र निवडणुकीच्या कामात व्यस्त आहेत. त्यामुळे दुधनी नागरिकांची अवस्था 'मुलं रडेना, आई दूध पाजेना' अशी झाली आहे.**



नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडे ६०० नळ कनेक्शन आहेत. नगर परिषदेकडून प्रति माणसे दिवसाला ७० लीटरप्रमाणे आठ लाख लीटर पाणी पुरवठा केला जातो.

२०११च्या जनगणनेनुसार दुधनी शहराची लोकसंख्या ही १० हजार १२० इतकी होती. त्यात आता वाढ होऊन १५ हजार इतकी झाली आहे. मागील दीड महिन्यापासून नगरपरिषदेकडून शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या बोरी नदीत मोठ्या प्रमाणात पाणीसाठा शिल्लक असून सुद्धा नगर पालिकेकडून पाणी उपसा केला जात नाहीये.

सध्या शहरातील विविध भागातील बोरवेल आणि विहिरच्या माध्यमातून पाणी उपसा करून खारट पाणी पुरवठा केला जात आहे. खारट पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

स्टेशनरोडवरील नागोबा नगर आणि रेणुकानगरमधील नागरिकांची पाण्यासाठी हाल होत आहे. नागोबानगर आणि रेणुका नगरमध्ये मागील पंधरा दिवसांपासून सार्वजनिक पाणीपुरवठा बंद आहे. यामुळे ऐन उन्हाळ्यात कोणी पाणी देता का? पाणी... असं विचारण्याची वेळ या परिसरातील नागरिकांवर आली आहे.

सय्यद बाहोद्दीन दर्ग्याजवळील बोअरवेल मोटार जाळले आहे. नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांनी दुरुस्तीसाठी जळलेले मोटार घेऊन पंधरा दिवस उलटले तरी अद्याप मोटार आणून बसविण्यात आले नाही. यामुळे येथील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. सद्या मुस्लीम बांधवांचे पवित्र सण रमजान सुरू आहे. रमजान सारख्या पवित्र सणासुदीच्या काळात पाणीपुरवठा होत नसल्याने दुधनी नगरवासियांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

महावितरणकडून कमी दाबाने विद्युत पुरवठा होत असून याचा परिणाम पाणी उपसा करताना वारंवार मोटारी जळत आहेत. यामुळे पाणी पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. या संदर्भात महावितरणशी पत्रव्यवहार केला आहे. मात्र, महावितरणकडून योग्य प्रतिसाद मिळत नाहीये. येत्या दोन-तीन दिवसात पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येईल.

- चिदानंद कोळी,
(पाणीपुरवठा विभाग दु. न. पा.)

## नागरिकांनी धार्मिक सलोखा राखावा : अनिल सनगल्ले

सुराज्य/अक्कलकोट

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, रमजान ईद असे सर्वधर्मीय उत्सव आहेत. काही समाजकंटक हेतू परस्पर सोशल मीडियावर खोट्या अफवा प्रसारित करून जातीय सलोखा नाहीसा करून शांतता भंग करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. समाजात तेढ निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा वळसंग पोलीस ठाण्याचे सपोनी अनिल सनगल्ले यांनी दिला आहे.**

नागरिकांनी खोट्या अफवावर विश्वास ठेवून कोणीही कोणत्याही समाजाचा भावना दुखावणारे, लोकांना भडकावून शांतता भंग करणे किंवा दोन समाजामध्ये तेढ निर्माण पोस्ट करू नयेत अन्यथा पोस्ट करणाऱ्या इसमाविरुद्ध पुन्हा केल्याचे समजून त्याच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. वळसंग पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या गावांमधील दोन्ही उत्सवादरम्यान शांतता व सामाजिक सलोखा राखण्यासाठी पोलिसांना नागरिकांनी सहकार्य करावे, असे आव्हान सनगल्ले यांनी केले आहे.

## महा-ई-सेवा केंद्रामार्फत सर्व सेवा चालू ठेवाव्यात

### महा-ई-सेवा केंद्र संघटनेतर्फे आ. सचिन कल्याणशेट्टी यांना निवेदन

सुराज्य/अक्कलकोट



**अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना महा-ई-सेवा केंद्र संघटना अक्कलकोट यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले.**

दि १ एप्रिल २०२३ पासून जिल्ह्यातील सर्व सेतू केंद्र बंद करण्याचे आदेश निघाले आहे. सध्या सेतूमध्ये मिळणारे सर्व दाखले प्रतिज्ञापत्र हे जिल्ह्यातील सर्व महा-ई-सेवा केंद्रामध्ये माफक दरात उपलब्ध आहेत. सध्या सेतू केंद्र बंद असल्यामुळे महा-ई-सेवा केंद्रावर नागरिकांचे प्रचंड गर्दी पहावयास मिळत आहे. प्रशासनाने सेतू बंद करण्याचे काढलेले आदेश न बदलता जिल्ह्यातील सर्व महा-ई-सेवा केंद्र चालक यांना नागरिकांना सेवा देण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. अक्कलकोट तालुक्यात सुमारे शंभर महा-ई-सेवा केंद्र कार्यरत आहेत. त्यामुळे सर्व नागरिकांना आपापल्या गावातच सर्व सेवा मिळते, त्याकरिता शहराकडे येण्याची गरज नाही. त्यामुळे नागरिकांचा पैसा आणि वेळ हे दोन्ही बचत होते. गरज पडल्यास मोठ्या गावामध्ये महा-ई-सेवा केंद्र मंजूर नाहीत त्या ठिकाणी नव्याने सेवा केंद्र मंजुरी द्यावी, तसेच सर्व महा-ई-सेवा केंद्र स. ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत सेवा देत असतात. सर्व महा-ई-सेवा केंद्र चालकांना सेवा देण्याची एक संधी उपलब्ध करून द्यावी यासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले आहे.

यावेळी आमदार सचिन कल्याण यांनी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. यावेळी संघटनेचे तालुकाध्यक्ष स्वामीनाथ धनशेट्टी, सिद्धाराम जकापुरे, दत्तात्रय कटारे, मौलाली शेख, वीरेश जोळद, यल्लाप्पा निंबाळकर, कोंडीबा राजगुरू, आदम मुजावर, नीलकंठ दरगोंडा, पंचया स्वामी, अमोल पाटील, सरपंच चिदानंद माळगे, गणेश पोतदार, महेश मंगरूळे बसवराज कलशेट्टी, सोनाली यादव आदी महा-ई-सेवा केंद्र चालक उपस्थित होते.

## श्रध्दा हॉस्पिटलच्या वर्धापन दिनानिमित्त हरिनाम सप्ताह

सुराज्य/बार्शी

**सोलापूर जिल्ह्याच्या वैद्यकीय सेवा क्षेत्रात कार्यक्षम योगदानामुळे वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या डॉ. गुलाबराव व मिनाक्षी पाटील फाउंडेशन आयोजित श्रध्दा हॉस्पिटल बार्शीच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व संगीत तुलसी रामायण ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन केले असल्याची माहिती डॉ. रोहन पाटील यांनी दिली. यावेळी ज्येष्ठ शल्यकर्मी डॉ. गुलाबराव पाटील व ज्येष्ठ स्त्रीरोगतज्ञ डॉ. मिनाक्षी पाटील, डॉ. श्रध्दा पाटील आदी उपस्थित होते.**

यावेळी डॉ. पाटील म्हणाले, 'गेल्या पाच वर्षात हॉस्पिटलने सामाजिक जाणिवा जपत रूग्णसेवा केंद्रबिंदू मानत विविध व्याधींवर निदान उपचार, शस्त्रक्रिया सेवा दिली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान व प्रशिक्षित वैद्यक, तंत्रज्ञ व प्रशिक्षित कर्मचारी हे या हॉस्पिटलचे वैशिष्ट्ये आहेत. समाजातील धार्मिक श्रध्दाभाव दृढ व्हावा या हेतूने या उपक्रमाचे आयोजन केले आहे. हे कार्यक्रम दि.१६ एप्रिल ते २३ एप्रिल या कालावधीत होणार आहेत. दि.१६ रोजी पुणे येथील ह.भ.प. शंकर महाराज शेवाळे यांचा हरिजागर, १७ रोजी भिवंडी येथील ह.भ.प. वनिता महाराज पाटील यांचा हरिजागर, १८ रोजी गेवराई येथील ह.भ.प. अक्रूर महाराज साखरे यांचा हरिजागर, १९ रोजी पाटोडा येथील ह.भ.प. रणजीत महाराज जाधव याचा हरिजागर, २० रोजी परळी येथील ह.भ.प. केशव महाराज उखळीकर यांचा हरिजागर, तसेच २१ रोजी बीड येथील ह.भ.प. प्रकाश महाराज साठे, २२ रोजी ह.भ.प. बाळू महाराज गिरगांवकर यांचा हरिजागर, २३ रोजी श्रीक्षेत्र सामनगांव येथील ह.भ.प. गुरूवर्य धर्मराज (दादा) महाराज यांचे सकाळी ९ ते ११ काल्याचे किर्तन व महाप्रसादाने सांगता होणार आहे.

या उपक्रमांमध्ये गायनाचार्य ह.भ.प. अभिमान महाराज ढाकणे, ह.भ.प. नामदेव महाराज नरवडे, ह.भ.प. भाग्यवंत रोडगे, कृष्णा महाराज, हार्मो नियम ह.भ.प. बापूराव गोफणे, मृंदगाचार्य ह.भ.प. योगेश म.जोगदंड, ह.भ.प. संदीप महाराज, ह.भ.प. ॲड. कृष्णा महाराज चव्हाण हे सेवा देणार आहेत.

या कार्यक्रमासाठी सतीश जाधवर व हरिश्चंद्र पाटील हे समन्वयकाची भूमिका बजावत आहेत. या कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील सर्व भजनी मंडळांनाही प्राधान्य दिले जाणार आहे.



## छ. शिवाजी महाराज आणि डॉ. आंबेडकरांचे विचार एकच: : फत्तेसिंह राजे भोसले

सुराज्य/वेळापूर

**छ. शिवाजी महाराज यांच्या विचारधारेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहिले. छ. शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार एक असून त्यातूनच बाबासाहेबांनी संविधान लिहिले व त्याचबरोबर छ. शिवाजी महाराजांचा अपमान करणाऱ्या मनुवादी लोकांचे कटकारस्थाने हाणून पडण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन संविधान वाचवण्यासाठी सर्वबहुजन समाजाने एकत्र आले पाहिजे, असे प्रतिपादन छत्रपती शिवाजी महाराज यांचे तेरावे वंशज शिवश्री फत्तेसिंह ऊर्फ बाबासाहेब राजे भोसले यांनी केले. ते वेळापूर पालखी मैदान येथे महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या व्याख्यानाच्या कार्यक्रमप्रसंगी बोलत होते.**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर हे होते. यावेळी विचारपिठावर शुभांगी फत्तेसिंह राजे भोसले, डॉ. कीर्तिपाल गायकवाड, प्राध्यापक भारत गायकवाड, डॉ. बापूराव ओव्हाळ, डॉ. जानराव, डॉ. अमोल गायकवाड, डॉ. कुमार लोंढे, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजी चव्हाण आदी उपस्थित होते.

प्रारंभी थोर पुरुषांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक रणजीत सरवदे यांनी केले. यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे फत्तेसिंह राजे भोसले यांचा सन्मान उत्तमराव जानकर यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच कार्यक्रमाला उपस्थित सर्व मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला जि. प. सदस्य बाळासाहेब धाईंजे, विजय बनसोडे, रिपाइं माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, भैय्यासाहेब बाबर, शिवाजी बनसोडे, दिलीप वाघमारे, बहुजन मुक्ती पार्टीचे राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य काकासाहेब जाधव, गोपाळ घाडगे, काशिनाथ आडत, रवी गायकवाड, कांतीलाल ठोकळे, रायचंद खाडे, गोपाळ क्षीरसागर, राजू जाधव, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष युवराज मंडले, विनायक माने, शिवाजी मोहिते, नागनाथ वाघमोडे, सौरभ वाघमारे, दत्ता वाघमारे खंडाळी, पिनू येडगे, राहुल सराटे, सुखदेव आडत, विश्वास वाघे, चंद्रकांत पोळ, रघुनाथ गोलारे, सोमनाथ बनसोडे, नितीन बनसोडे, राजकुमार बनसोडे, रतिलाल बनसोडे, हर्षद बनसोडे, निशांत लोंढे, दादा गालफडे, डॉ. विश्वास वाघमारे, प्रशांत बनसोडे, विल्सन बनसोडे, नितीन लोंढे यांच्यासह महिला, पुरुष, तरुणवर्ग कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांचे आभार सरपंच रजनिश बनसोडे यांनी मानले.

# नोकरीचे आमिष दाखवून तरुणाची २ लाखांची फसवणूक

## बार्शी येथील करिअर ॲकॅडमीतील एकावर गुन्हा दाखल

सुराज्य/कुर्डूवाडी

**रिधोरे ता. माढा येथील शेतकरी तरुणाला मोठ्या कंपनीत चांगल्या पदावर नोकरीला लावण्याचे आमिष दाखवून २ लाख ७ हजार ५०० रुपयांची फसवणूक केल्याबाबत बार्शी येथील करिअर ॲकॅडमीमधील एकावर कुर्डूवाडी पोलिसांत कोर्टाच्या आदेशान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अभिजीत दिगंबर ढोरे (वय २७) रा. रिधोरे ता. माढा यांनी फिर्याद दाखल केली आहे.**

मिथिलेश मिलिंद दीक्षित (वय ३७) रा. शिवाजी कॉलेज रोड, महाराष्ट्र बँकेजवळ, बार्शी याच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी की फिर्यादी अभिजीत ढोरे हा शेतकरी सुशिक्षित बेरोजगार तरुण होता. यांचे बार्शी येथे सारखे येणे-जाणे असल्याने करिअर ॲकॅडमीचे मिथिलेश दीक्षित यांच्याशी त्यांची ओळख झाली. मिथिलेश दीक्षित आपल्या ॲकॅडमीमार्फत नोकरीविषयक मार्गदर्शन करत असल्यामुळे फिर्यादीला तुम्हाला मी चांगल्या कंपनीत मोठ्या पदावर नोकरीला लावतो. त्यासाठी तुम्हाला काही रक्कम द्यावी लागेल असे सांगितले. यावरून फिर्यादीने घरच्यांशी चर्चा करुन मिथिलेश दीक्षित यांना नोकरी बघण्यास सांगितले. दि. ५ ऑगस्ट २०१८ रोजी फ्युचर मेकर या कंपनीत ब्रँच मॅनेजर या पदावर नोकरी लावतो. पगार देखील चांगला करून देतो. त्यासाठी फिर्यादीला २ लाख ७ हजार ५०० रुपयांची मागणी केली. पैसे दिले तरच तुमचे काम होईल. मला देखील पैसे पुढे द्यावे लागतात, असे सांगत फिर्यादीचा विश्वास संपादन केला.

फिर्यादी अभिजित ढोरे यांनी मिथिलेश दीक्षित याच्या बँक खात्यामध्ये ८ऑगस्ट २०१८ रोजी १ लाख ८ हजार ५०० रुपये, तसेच फिर्यादीच्या वडिलांच्या खात्यामधून ९९ हजार रुपये असे एकूण २ लाख ७ हजार ५०० रुपये पाठवले. त्यानंतर मिथिलेश दीक्षित याने सांगितल्यानुसार फिर्यादीला एक मेसेज आला. त्यानुसार त्यामध्ये बनावट पासवर्ड व मजकूर लिहिला होता. यानंतर एक महिन्यात फिर्यादीला सदर नियुक्तीपत्र मिळेल असे सांगितले मात्र महिना उलटून गेला तरीही नियुक्त पत्र फिर्यादीला आले नाही. म्हणून फिर्यादीने दीक्षित याच्याकडे चौकशी केली असता तुमचे काम होऊन जाईल असा विश्वास दिल्याने फिर्यादीने तब्बल एक वर्ष वाट पाहिली. त्यानंतर कोरोना प्रादुर्भावाचे कारण सांगत हा प्रादुर्भाव संपला की नोकरी लावून देतो असे सांगितले. त्यानंतर एक वर्ष लोटले तरी नियुक्ती पत्र नाही ना नोकरी नाही. त्यानंतर फिर्यादीने दीक्षित याच्याकडे दि. ५ डिसेंबर २०२२ रोजी नोकरीसाठी दिलेल्या रकमेची मागणी केली असता दीक्षित याने पैसेही नाही आणि नोकरी ही नाही. तुला काय करायचे ते कर कुठे जायचे तिथे जा, असे म्हणून फिर्यादीची फसवणूक केल्याबाबत कोर्टाच्या आदेशाने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## चिंचणी शाळेला १८ टॅब भेट

**पंढरपूर** : BOSCH इंडिया पुणे या कंपनीचे एमडी अविनाश चिंतावार यांनी चिंचणी शाळेला टॅब (लॅपटॉप) भेट देण्याचा आपला शब्द पूर्ण करून कंपनीकडून एचआर विजय पाटील, पल्लवी कदम, सुरज जाधव यांनी १८ टॅब (लॅपटॉप) व चित्रकला साहित्य भेट दिले. यावेळी चिंचणी ग्रामस्थ व जि.प. प्रा. शाळा चिंचणी यांच्या वतीने लोकार्पण कार्यक्रम घेण्यात आला होता. यावेळी कार्यकारी अभियंता दत्तात्रय गावडे, उपअभियंता भिमाशंकर मिटकरे, कृष्णा गोरे, ग्रामसेवक मच्छिंद्र जाधव, सहशिक्षक जालिंदर गायकवाड चिंचणी गावातील स्त्री/ पुरुष शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक मोहन अनपट यांनी तर सूत्रसंचालन समाधान काळे यांनी केले.

## आरसेटीमार्फत मोफत व्यवसाय प्रशिक्षणांचा लाभ घेण्याचे आवाहन

**सोलापूर** : ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार युवक - युवतींना मोफत व्यवसाय प्रशिक्षण देवून उद्योग व्यवसायाकडे वळविण्याच्या हेतूने सुरू असलेल्या बँक ऑफ इंडिया संचलित ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था अर्थात (आरसेटी) मध्ये या वर्षी जवळपास ३० व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येणार असून, सर्व मोफत निवासी स्वरुपाचे असणार आहेत. तरी सर्व ग्रामीण भागातील युवक युवतींना या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे संचालक दीपक वाडेवाले यांनी पत्रकाद्वारे केले आहे. यामध्ये युवतींसाठी शिवणकला, ब्युटीपार्लर, ज्युट प्रॉडक्ट उद्यमी, वस्त्र चित्रकला, ज्वेलरी बनविणे तसेच युवकांसाठी दुचाकी दुरुस्ती, मोबाईल रिपेअरिंग, फोटोग्राफी आणि व्हीडिओग्राफी व शेतीपूरक प्रशिक्षण शेळीपालन, दुग्धव्यवसाय व गांडूळखतनिर्मिती अशा वेगवेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण वर्षभर चालणार आहे. या सर्व प्रशिक्षणासाठी लागणारे साहित्य, प्रशिक्षणार्थींची निवास आणि भोजनाची व्यवस्था पूर्णपणे मोफत आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर पुढील दोन वर्षे पाठपुरावा करुन व्यवसाय उभारणीस मदत करण्यात येते. या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी हा सोलापुर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील असावा व त्याचे वय १८ पूर्ण व ४५ वर्षाच्या आतील असावे. अधिक माहितीसाठी ९२७२२०७१११ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही वाडेवाले यांनी केले आहे.

## दिशा समिती अंतर्गत केंद्र व राज्यस्तरी योजनांची आढावा बैठक

**सोलापूर** : जिल्हा परिषदेच्या दिशा समितीअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध २९ केंद्रस्तरीय योजना अंतर्गत झालेल्या कामांची माहिती तातडीने सादर करावी, अशा सूचना जिल्हा परिषद अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी आज येथे दिल्या.जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या सूचनेनुसार सोलापूर जिल्ह्यातील दिशा समिती अंतर्गत केंद्रीय योजनांच्या अंमलबजावणीची आढावा बैठक घेण्यात आली. या आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाच्या सभागृहात झालेल्या या बैठकीस जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक उमेशचंद्र कुलकर्णी, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे प्रकल्प संचालक सुहास चिटणीस, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधीन शेळकंदे, महानगरपालिकेचे शहर अभियंता लक्ष्मण चलवादी यांच्यासह जिल्हा परिषदेचे सर्व खातेप्रमुख, विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सोलापूर जिल्ह्यामध्ये तीन खासदार आहेत. सदर खासदार मतदारसंघनिहाय राबविण्यात येणाऱ्या केंद्रीय योजनांची अद्ययावत माहिती संबंधित खातेप्रमुखांनी तातडीने उपलब्ध द्यावी व त्याची माहिती पुस्तिका प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी विहित वेळेत सादर करावी, अशा सूचना यावेळी देण्यात आली.

## जयंती व सण-समारंभाच्या काळात लाईट सुरळीत देण्याची मागणी

**अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यात सध्या रमजान,यात्रा व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव सुरु असल्याने या काळात वारंवार वीज खंडीत होणे,डीपीत आग होणे ,विद्युत तारा तुटणे आदी प्रकार होऊन ऐन सण-समारंभाच्या काळात विजेची समस्या निर्माण होऊन कार्यक्रमात व्यत्यय निर्माण होते.यामुळे संपूर्ण गावकर्यांना अंधारातच रात्र काढावी लागते.म्हणून संबंधित महावितरण कंपनीचे अधिकारी याकडे लक्ष गरजेची आहे.म्हणून आज पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे रोजगार आघाडी प्रदेशाध्यक्ष विकीबाबा चौधरी, भैय्यासाहेब कांबळे ,बळीराजा गजाकोस, भीमाशंकर म्हेत्रे ,स्वामी कुंभार ,मुरमु शेख आदींनी अक्कलकोटचे उप अभियंता संजयकुमार म्हेत्रे यांना निवेदन सादर करुन तालुक्यात सुरळीत वीज देण्याची मागणी केली.

## रियाज तांबोळी यांची राज्यस्तरीय मॅट कुस्तीसाठी राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



**सांगोला** : कोळा विद्यामंदिर ज्युनिअर कॉलेज मधील विद्यार्थी व कोळा येथील गुरुमुर्ती कुस्ती केंद्रातील पैलवान राष्ट्रीय पातळीवर खेळणारा पैलवान रियाज वजीर तांबोळी यांने ग्रीको रोमन ५५ किलो वजनी गटात राज्याला प्रथम क्रमांक मिळवून राष्ट्रीय पातळीवर निवड झाली गुरुमुर्ती कुस्ती केंद्राचे विशेष म्हणजे मॅट नसतानाही आत्तापर्यंत दोन पैलवान नॅशनल साठी खेळलेले आहेत महाराष्ट्रातील अशी एकमेव तालीम आहे की त्या तालमी मधील पैलवान मातीत प्रॅक्टिस करून राष्ट्रीय स्तरावर खेळतात आणि मॅटवर नंबर मिळवतात.

## शहीद जवान संस्थेतर्फे फुले जयंती साजरी

**सुराज्य/सोलापूर** : शहीद जवान संस्थेच्यावतीने थोर समाज सुधारक संपूर्ण समाजाचे प्रबोधन करून भारतीय शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती नेहरू चौक, सांगोला येथे साजरी करण्यात आली. उद्योगपती राजाभाऊ गोडसे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी भिमराव बनकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

### सोलापूर स्मार्ट सिटी संचालक मंडळ बैठक

# दुहेरी जलवाहिनी कामा संदर्भात पोचमपाडच्या तडजोड प्रस्तावावर दीर्घ चर्चा

### आणखी एक बैठक होणार; त्यानंतरच लवादाकडे करणार प्रस्ताव सादर

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर स्मार्ट सिटी कार्पोरेशनच्या संचालक मंडळाच्या गुरुवारी झालेल्या बैठकीत उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनी कामासंदर्भात स्मार्ट सिटी व पोचमपाड यांच्यातील तडजोड प्रस्तावाअंतर्गत नियम, अटी - शर्तीवर दीर्घ चर्चा झाली. आणखी एक बैठक होणार असून त्यामध्ये त्यावर शिक्कामोर्तब होईल आणि त्यानंतरच अंतिम तडजोड प्रस्ताव लवादाकडे सादर करण्यात येणार आहे, अशी माहिती सीईओ शितल तेली - उगले यांनी दिली.



सोलापूर स्मार्ट सिटी संचालक मंडळाची आज गुरुवारी बैठक पार पडली. या बैठकी संदर्भातील अधिक माहिती सीईओ शितल तेली - उगले यांनी दिली. त्या संदर्भात बोलताना त्या पुढे म्हणाल्या, सोलापूर स्मार्ट सिटी कार्पोरेशनच्या संचालक मंडळाच्या या बैठकीत उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनीच्या कामासंदर्भात जुना मक्तेदार असलेल्या पोचमपाड कंपनीने लवादात धाव घेतली आहे. दरम्यान, याप्रकरणी तडजोडीने निर्णय घेण्यात येणार आहे. तडजोडी संदर्भातील नियम, शर्ती व अटी या संदर्भातला प्रस्ताव तयार करण्यात येणार आहे. यावर आजच्या बैठकीत महत्वपूर्ण चर्चा करण्यात आली.

याविषयी आणखी एक बैठक होणार आहे. त्यामध्ये अंतिम प्रस्ताव तयार करण्यात येईल आणि तो प्रस्ताव रितसर लवादाकडे सादर करण्यात येणार आहे. त्यानंतरच लवादाकडून या संदर्भात निर्णय घेण्यात येणार आहे, असेही स्मार्ट सिटीच्या सीईओ शितल तेली - उगले यांनी स्पष्ट केले.

**पोचमपाडचा २० कोटी रुपये कमीचा प्रस्ताव एमजीपीकडे पाठविणार**

दरम्यान, उजनी – सोलापूर समांतर जलवाहिनीचे काम २० कोटी रुपयांनी कमी करण्यासंदर्भातला पोचमपाड कंपनीचा प्रस्ताव स्मार्ट सिटीच्या आजच्या बैठकीत मान्य करण्यात आला. तो प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविण्यात येत आहे, असेही सीईओ शितल तेली – उगले यांनी सांगितले.

# स.पो.आयुक्त दीपक आर्वे यांचा देहदानाचा संकल्प

**सुराज्य/सोलापूर**

जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामार्फत बुधवारी शहर यांच्या संयुक्त विद्यमाने पोलिस अधिकारी आणि पोलिस अंमलदार यांच्याकरिता अवयवदानाविषयी माहिती व जनजागृतीबाबत एकदिवसीय कार्यशाळा मिटिंग हॉल येथे झाली.यावेळी सहायक पोलिस आयुक्त दीपक आर्वे यांनी देहदान करण्याचा संकल्प केला. या कार्यशाळेस ७५ पोलिस अधिकारी आणि पोलिस अंमलदार उपस्थित होते.





डॉ.वैशंपायन स्मृती शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय आणि पोलिस आयुक्तालयाच्या वतीने हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ.औदुंबर म्हस्के, डॉ. विनायक डोईजड उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सहायक पोलिस आयुक्त दीपक आर्वे होते.

डॉ.औदुंबर म्हस्के यांनी प्रेझेंटेशनद्वारे अवयवदानाचे प्रकार, नैसर्गिक मृत्यूनंतर कोणते अवयव दान करता येतात. जिवंतपणी कोणते अवयव दान करता येतात यांची माहिती दिली. शिवाय नेत्रदानाबद्दल माहिती, आरोग्यसेवक आणि नातेवाइकांचे कर्तव्य, मानवी अवयव दानाबद्दलचा कायदा याविषयी मार्गदर्शन केले. तसेच डॉ. औदुंबर म्हस्के यांनी उपस्थित पोलिस अधिकारी आणि पोलिस अंमलदारांना अवयवदानाची प्रतिज्ञा दिली.

## सांगोला शहरातील भीमनगर येथे विविध कार्यक्रम

**सुराज्य/सांगोला**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सांगोला शहरातील भीमनगर येथे मंगळवार दि.११ एप्रिल ते मंगळवार दि.२५ एप्रिल पर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जयंती उत्सव मंडळाच्या वतीने देण्यात आली आहे.मंगळवार दि.११ एप्रील रोजी महात्मा ज्योतिबा फुले जयंती निमित्त सकाळी ९.३० वा.भीमनगर मधील नगरपरिषदेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या हस्ते क्रांतिज्योती ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करुन पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. गुरुवार दि.१३ एप्रिल रोजी रात्री १२ वा. तहसीलदार अभिजीत पाटील,पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी,गटविकास अधिकारी आनंद लोकरे तसेच न.पा. चे मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांच्या शुभहस्ते विश्वशांतीदूत, तथागत भगवान गौतम बुद्ध व विश्वरत्न,भारतरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच अर्ध पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन १४ तोफांची निळी सलामी देण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त शुक्रवार दि.१४ एप्रिल रोजी सकाळी ९ वा. सांगोला शहरातून निघणाऱ्या भव्य प्रभात फेरीचे उदघाटन भीमनगर मधील सांगोला नगरपरिषदेचे सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.तसेच सकाळी ९.३० वा.समस्त सैनिक दलांचे संचलन व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्रास व धम्मध्वजास मानवंदना,सकाळी १० वा.भिमनगर मधील जयंती उत्सव मंडपातील सिंहासनस्थ मूर्तीचे पूजन व पंचशील ध्वजारोहण,सकाळी १०.३० वाजता आमदार शहाजीबापू पाटील तसेच माजी आमदार दिपकआबा साळुंखे-पाटील,शेकापचे युवा नेते डॉ. बाबासाहेब देशमुख,आजी-माजी नगराध्यक्ष व आजी-माजी नगरसेवक तसेच सांगोला तालुक्यातील विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांच्या शुभहस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्ध पुतळ्यास सामुदायिक पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे. तर, सायंकाळी ४ वा.विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सिंहासनस्थ मूर्तीची व प्रतिमेची भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

## चारित्र्यावर संशय घेत पत्नीचा छळ; पतीसह चौघांवर गुन्हा

**सुराज्य/सोलापूर**

चारित्र्यावर संशय घेत पत्नीचा छळ केल्याप्रकरणी पतीसह चार जणांवर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी विशाखा लक्ष्मीनारायण कंदीकटला (वय ३०, रा. श्रुषी अविनी अपार्टमेंट, एमआयडीसी) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

फिर्यादी विशाखा यांचा लक्ष्मीनारायण व्दारकेश कंदीकटला याच्याशी २०१७ मध्ये विवाह झाला होता. विवाहानंतर आरोपी लक्ष्मीनारायण हा फिर्यादीच्या चारित्र्यावर संशय घेत होता. आरोपी चारित्र्यावर संशय घेत पत्नीला मारहाण करत होता तक्रार विशाखा यांनी दिली आहे. या तक्रारीवरून पती लक्ष्मीनारायण कंदीकटला, सासू विमल व्दारकेश कंदीकटला, सासरे व्दारकेश अंबाजी कंदीकटला, दीर आकाश कंदीकटला (सर्व रा.सिध्दी भवन,सोनियानगर,जुना विडी घरकुल) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

# बँकेकडे तारण ठेवलेल्या जमिनीची विक्री

**दोघांवर गुन्हा दाखल**

**सुराज्य/मोहोळ**

कर्जदार व जामीनदाराने संगणमत करून बॅंकेकडे तारण म्हणून ठेवलेल्या जमीनीची विक्री करून बॅंकेची फसवणूक केल्याने मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना महाराष्ट्र बँक (पेनूर ) ता मोहोळ येथे घडली.

दि. ३० मार्च २०२२ रोजी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा पेनूर ला गाव तलाठ्याने नोटीस पाठवून सुनिता बाळासाहेब भांगे ( रा. पेनूर ) यांनी त्यांची शेतजमीन गट नंबर ७१५/३/क मधील एकुण ०२ हे. ०४ आर. ही शेत जमीन परमेश्वर दगडू राऊत (रा.पेनूर ) यांना दि. २९ मार्च २०२२ रोजी विकली. बँकेची काही हरकत असेल तर हरकत घ्यावी म्हणून नोटीस दिली. बँकेचे मॅनेजर कोठेश्वराव रामराव मंधीनी, (रा.विनायक अपार्टमेंट, माळी वस्ती, लक्ष्मी टाकळी रोड पंढरपूर) यांनी वरील दोन्ही नावांच्या बाबत माहिती घेतली असता,सुनिता भांगे यांच्याकडे दोन कर्ज खात्यामध्ये २० लाख ३५ हजार रुपये कर्ज असल्याचे निदर्शनास आले.सदर कर्ज घेताना भांगे यांनी बँकेकडे रितसर कर्ज मागणी, जामिनकीचा करार, शेतजमीनीचे गहाणखत वगैरे कागदपत्र दिलेले असताना व त्यांना कर्ज फरतफेडीच्या सर्व अटी व शर्ती तसेच त्यांच्या जमिनीवर कर्जाचा बोजा असताना कर्जाचेच जमीनदार परमेश्वर राऊत यांना ती जमीन खरेदीखत करून दिली.

त्यानुसार बँकेला तारण असलेली जमीन बँकेच्या परस्पर विकून २० लाख ३५ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी कर्जदार सुनिता भांगे व जामीनदार परमेश्वर राऊत अशा दोघांवर मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बँकेच्या वतीने बँकेचे कायदेशीर सल्लागार ॲड. विशाल गावडे यांनी काम पाहिले.

## दहावी बोर्ड परीक्षा बनावट प्रवेशिका बनविल्याच्या आरोपातून दोघे निर्दोष

### तब्बल १७ वर्षानंतर लागला निकाल

**सुराज्य/सोलापूर**

दहावी बोर्ड परीक्षेकरिता गणित विषयाच्या पेपरला बनावट रिसीट (प्रवेशिका) बनवून खोट्या विद्यार्थ्यांना परीक्षेकरिता बसविण्याच्या प्रयत्नात असलेल्या एजंट हरिदास गायकवाड आणि बनावट रिसीट बनवणारे गणेश चोपडे यांची मुख्य न्याय दंडाधिकारी विक्रमसिंह भंडारी यांनी सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली आहे.तब्बल १७ वर्षानंतर हा निकाल लागला.

मार्च २००५ मध्ये दहावी बोर्ड परीक्षा करिता गणित विषयाच्या पेपरला सोलापूर येथील मॉडर्न हायस्कूलचा विद्यार्थी अरुण म्हेत्रे व विनोद बंडगर यांना मदत करण्याकरिता एजंट मार्फत बनावट विद्यार्थी व परीक्षा रिसीट तयार करून परीक्षा देण्याच्या प्रयत्नात तिघेजण होते.

त्यावेळी २८ मार्च २००५ रोजी साईप्रसाद हॉटेल येथे सापळा रचून सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पथकाने त्या तिघांना अटक करून त्यांच्या विरुध्द गुन्हा नोंदविला. तपास होऊन दोषारोप पत्र दाखल करण्यात आले.या खटल्याची सुनावणी मुख्य न्यायदंडाधिकारी भंडारी यांच्या समोर सुमारे १७ वर्षानंतर सुरू झाली.या खटल्याचे कामी ७ साक्षीदारांच्या शपथेवर साक्षी सरकार पक्षाने नोंदवल्या होत्या. परंतु साक्षी जबाब,उलट तपास यामध्ये बऱ्याच तफावती दिसून आल्या.आरोपी विरुद्ध गुंन्ह्याच्या अनुषंगाने आरोपाची मालिका परिपूर्ण असल्याचे सरकार पक्षाला शाबित करता आले नाही. आरोपीच्या वतीने एडव्होकेट सुरेश गायकवाड यांनी दोषरोप व साक्षीजबाब यातील विसंगती व अपुरेपणा याबाबत अनेक महत्त्वपूर्ण न्याय निवाडे सादर करून सरकार पक्षाचे आरोप खोडून काढले. त्यावर मेहरबान न्यायालयाने आरोपीच्या वतीने ॲड. सुरेश गायकवाड व ॲड. मंजुश्री देशमुख यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून दोन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. यात सरकार पक्षाची बाजू सरकारी वकिल जोशी यांनी मांडली.

## अंमली पदार्थविरोधात सर्व यंत्रणांनी सतर्कतेने कार्यवाही करावी : पोलीस अधीक्षक

**सुराज्य/सोलापूर**

अंमली पदार्थ संदर्भात कारवाई करतेवेळी न्यायालयाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे. तसेच जिल्ह्यात अंमली पदार्थांचा वापर रोखण्यासाठी संबंधित सर्वच यंत्रणांनी सतर्कतेने कार्यवाही करावी,अशा सूचना जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) शिरीष सरदेशपांडे यांनी दिल्या.जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.जिल्हा तसेच तालुका पातळीवर आढळणाऱ्या अंमली पदार्थाचे सेवन व वापर,अंमली पदार्थाच्या वापरावर आळा घालण्यासाठी तसेच त्या संदर्भात येणाऱ्या समस्या प्रभावीपणे हाताळण्यासाठी या समितीची स्थापना करण्यात आली आहे.

यावेळी सीमा शुल्क विभागाचे सहाय्यक आयुक्त फुलचंद राठोड,डॉ.हर्षल थडसरे,लोहमार्ग पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक संतोष गायकवाड, बी.डी.डी.एस./ श्वान पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रदीप पवार,आर.आर.कुरणे यांच्यासह कृषि,टपाल, माहिती विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्ह्यात गांजा व खसखसची लागवड झाल्यास पीकपाहणी दरम्यान त्याबाबतची माहिती काढून कृषि विभागाने पोलीस विभागाशी संपर्क करावा.बॉंब शोधक व नाशक पथकाने त्यांचे अधिपत्याखालील अंमलदार यांना सतर्क करुन सोलापूर ग्रामीण जिल्हा हद्दीमध्ये असणाऱ्या कुरिअर कंपनीच्या गोडाऊन,चालू व बंद पडलेल्या रासायनिक कंपन्यांची माहिती संकलीत करुन त्यांची वेळोवेळी तपासणी करण्याचे आदेशही त्यांनी यावेळी दिले. सर्व सदस्यांनी दत्तक देण्यात आलेल्या तालुक्यातील शाळा व महाविद्यालये तसेच महत्त्वाच्या ठिकाणी महिन्यातून किमान एक वेळा भेट देऊन अंमली पदार्थासंदर्भात जनजागृती करावी.आरोग्य विभागाने अंमली पदार्थाच्या आहारी गेलेल्या लोकांवर उपचार करून त्यांचे समुपदेशन करावे,अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.तसेच समिती सदस्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही प्रकारे अंमली पदार्थ उत्पादन होत नसल्याबद्दल दक्ष राहावे,असे त्यांनी सांगितले.

# डिझेल चोरी करणारी आंतरराज्य गुन्हेगारी टोळी जेरबंद

**सुराज्य/सोलापूर**

पेट्रोल पंपावरील कर्मचारी झोपल्यानंतर पंपाच्या मुख्य टाकीमध्ये पाईप टाकून ते मोटारीच्या सहाय्याने ओढून डिझेल चोरी करणाऱ्या आंतरराज्य टोळीला सोलापूर तालुका पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली आहे. त्यांच्याकडून चोरीतील १ हजार लिटर डिझेल सह पंधरा लाखांचे मुद्देमाल जप्त केले आहे.

रामा पाण्या पवार ( वय ४५), लक्ष्मण पाण्या पवार ( वय ४७), गणेश बाळू पवार ( वय ३०), किरण अर्जुन काळे ( वय २०), सचिन छगन शिंदे ( वय २३, सर्व रा. तेरखेडा, ता. वाशी, उस्मानाबाद), शंकर गर्जेंद्र पवार ( वय ३४, रा. लक्ष्मी नगर, भुम), उध्दव बापू शिंदे ( वय २३, रा. वाशी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

फिर्यादी सुमित शरणप्पा चिलोबा (वय ३२, रा. महर्षी नगर, शेळगी) यांच्या काकाच्या मालकीचे बोरामणी ता. दक्षिण सोलापुरातील पेट्रोल पंपाच्या डिझेलच्या टाकीतून ४ लाख ६३ हजाराचे पाच हजार लिटर डिझेल चोरल्याप्रकरणी सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणाचा तपास करताना मिळालेल्या



माहिती नुसार हा गुन्हा हा तेरखेडा जि. धाराशिव येथील ७ संशयित इसमांनी केल्याची माहिती मिळाली. शिवाय ते कर्नाटकातील बसवकल्याण येथे असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार डी. बी. पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी संशयित इसमाचा बसवकल्याण राज्य कनार्टक येथे जाऊन शोध घेत ७ संशयित इसमांना ताब्यात घेतले. विचारपूस केल्यानंतर सर्वांना शुक्रवारी अटक करण्यात आली. न्यायालयाने आरोपींना पाच दिवसांची पोलीस कस्टडी सुनावली. वरील आरोपींकडून गुन्ह्यातील चोरी केलेल्या डिझेलची वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले १४ लाख रूपये किंमतीचा एक मालट्रक, चोरी केलेल्या डिझेल पैकी १ लाख ३९८ रूपये किमतीचे १०५० लिटर डिझेल प्लॅस्टिक कॅन्डसह, १५ हजार रूपये किमतीचे मोबाईल हॅन्डसेट, डिझेलची चोरी करणे करीता वापरलेल्या साडे सहा हजाराचे साहित्य असे एकूण १५ लाख २२ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा अधिक तपास गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उप-निरीक्षक सुरज निंबाळकर करीत आहेत. वरील गुन्ह्यातील आरोपींवर कर्नाटक राज्यातील नेसर्गी, रामदूर्ग व अंतनी पोलीस ठाण्यात पेट्रोल पंपातील डिझेल चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नामदेव शिंदे यांचे नेतृत्वाखाली सोलापूर तालुका, पोलीस ठाणे कडील गुन्हे प्रकटीकरणातील सुरज निंबाळकर, पोलीस उपनिरीक्षक, पोह संजय देवकर, पोना शशीकांत कोळेकर, सुनील कुंवर, पैंगबर नदाफ, फिरोज बारगीर, महादेव सोलकंर, वैभव सूर्यवंशी व सायबरचे व्यंकटेश मोरे, पोलीस अंमलदार धीरज काकडे यांनी केली.





## तयारी भीमजयंतीची...

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने शहरात बाबासाहेबांचे विविध आकाराची पुतळे विक्रीसाठी आणण्यात आले आहेत. दुसऱ्या छायाचित्रात प्रेरणाभूमी अस्थिविहार येथे सुशोभिकरणाचे काम अंतिम टप्प्यात आल्याचे दिसत असून तिसऱ्या छायाचित्रात आकर्षक विद्युत रोषणाईचे काम सुरू आहे.

## महापालिका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी बनसोडे; सरचिटणीसपदी चोरगी

### उपाध्यक्षपदी दैनिक सुराज्यचे अजित उंब्रजकर



**सोलापूर** : महापालिका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी किरण बनसोडे यांची तर उपाध्यक्षपदी दैनिक सुराज्यचे अजित उंब्रजकर यांची तर सरचिटणीसपदी प्रमिला चोरगी तर खजिनदारपदी चंद्रकांत मिराखोर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. महापालिका पत्रकार संघाची वार्षिक सभा गुरुवारी पार पडली. यावेळी या निवडी करण्यात आल्या मावळते अध्यक्ष राकेश कदम यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. इतर पदाधिकारी असे - उपाध्यक्ष - आफताब शेख, चिटणीस - विशाल भांगे, रोहन श्रीराम, संदिप वाडेकर, कार्यकारणी सदस्य - आप्पासाहेब पाटील, सलमान पिरजादे, विकास कस्तुरे, अभिषेक अदेप्पा, यशवंत गुरव, बालाजी चिटमिल, प्रभू वारशेट्टी, अनिल कांबळे, आयुब कागदी सल्लागार प्रशांत जोशी, प्रशांत माने, समाधान वाघमोडे, सादिक इनामदार आदी. निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

## शेतकऱ्यांना साडेनऊ कोटींचे अनुदान मंजूर



**सांगोला** : सांगोला तालुक्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. यावर सदर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी आमदार शहाजीबापू पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे समक्ष भेटून केली होती. सांगोला तालुक्यातील ५४२० लाभार्थी शेतकऱ्यांना एकूण ९ कोटी ५० लाख रुपयांचे अनुदान मंजूर झाले असून हे अनुदान संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा झाले असल्याची माहिती आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली. एकूण लाभार्थी शेतकऱ्यांपैकी ८० ते ८५ टक्के शेतकऱ्यांच्या अनुदानाची रक्कम खात्यामध्ये जमा झाली असून ज्या शेतकऱ्यांचे आधार नंबर बँक खात्याला जोडले नाहीत अशा शेतकऱ्यांचे अनुदान जमा झाले नाही या सर्व शेतकऱ्यांनी आपला आधार क्रमांक बँक खात्याला जोडून घ्यावा व ५० अथवा १०० रुपयांचा व्यवहार सदर बँक खात्यामध्ये करावा जेणेकरून बँक खाते चालू होऊन अनुदानाची रक्कम त्वरीत लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा होईल. तरी ज्यांचे अनुदान जमा झाले नाही त्यांनी त्वरित वरील प्रमाणे कार्यवाही करावी असे आवाहन आमदार शहाजीबापू पाटील यांनी केले व त्वरित अनुदान जमा केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. मोबाईलचा हट्ट; पत्नीने तापाच्या चाळीस गोळ्या खाल्ल्या

## प्रेम संबंधावरून तरुणास मारहाण

**सोलापूर** : प्रेम संबंधावरून तरुणास मारहाण करण्यात आली. ही घटना ७ एप्रिल रोजी दुपारी साडेपाच वाजण्याच्या दरम्यान श्राविका प्रशालेसमोर घडली. गौरव किरण पात्रे (वय-२६,रा.वीरफकीरा चौक,न्यू बुधवार पेठ) हा श्राविका प्रशाला येथून जात असताना त्याला सागर मल्लिनाथ देवकुळे याने तू माझ्या बहिणीच्या पाठीमागे येतो असे म्हणत मारहाण करून जखमी केलेतसेच मल्लिनाथ दगडू देवकुळे, रोहन बापू देवकुळे, बापू दगडू देवकुळे (सर्व.रा.वीरफकीरा चौक, न्यू बुधवार पेठ) यांनीही त्यास शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली आहे.ही घटन अशा आशयाची फिर्याद गौरव पात्रे यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सागर देवकुळे, मल्लिनाथ देवकुळे, रोहन देवकुळे, बापू देवकुळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोसई ताकभाते हे करीत आहेत.

# वाळू ठेके बंद मात्र वाळू तस्करी जोमात

### ● बेकायदा गौण खनिज प्रकरणात ९० कोटींचा दंड; मात्र तिजोरीत सव्वा कोटी जमा ● ६०० गुन्हे दाखल; ४६४ आरोपी गजाआड

**सुराज्य/सोलापूर**

जिल्ह्यात गतवर्षी अवैध गौण खनिज प्रकरणात जिल्हा प्रशासनाने ७७६ प्रकरणांत जवळपास ८९ कोटी ७५ लाख ६९ हजार रुपयांच्या दंडाची कारवाई केली आहे. तर आतापर्यंत १ कोटी २४ लाख ८४ हजाराचा महसूल शासनाच्या तिजोरीत जमा झाला आहे. तर६०० जणांवर गुन्हे दाखल केले असून ४६४ आरोपींना गजाआड करण्यात आल्याची माहिती अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी दिली.

अनेक जिल्हातील वर्षांपासून वाळू लिलाव बंद आहेत. तरी देखिल वाळूला प्रचंड मागणी आहे. वाळू उपसा बंद असताना देखिल वाळू तस्काराचा धुमाकूळ चालूच आहे. चोरी वाळू असो मुरूम, दगड मातीचा उपसा आणि वाहतूक चालूच आहे. यावर जिल्हाप्रशासनाची करडी नजर असते मात्र वाळू तस्कर आणि प्रशासनातील काही अधिकाऱ्यांची मिलभिग असल्याचे हा वाळू तस्करीचा गौरधंदा जोमात आहे. प्रशासनाने



शहर जिल्हामध्ये बेकायदा वाळू मुरूम,माती, दगड उपसा आणि वाहतूक प्रकरणी अनेक गुन्हे दाखल करत कोट्यावधिचा दंड केला आहे .मात्र शासनाच्या तिजोरीत वसुल झालेली रक्कम तोडकी आहे. त्यामुळे या कारवाईचा फास जोरात आवळा गेला पाहिजे तर या बैकायदा उपसा आणि तस्करीला आळा बसणार आहे. कारवाई प्रकरणात पथकावर हल्ले देखिल झाले आहे. जवळपास १२ घटना घडल्या आहेत. तर तस्करीमध्ये वापरण्यात आलेली १७९ वाहने जप्त करण्यात आली आहेत.



### आत्तापर्यंत झालेला दंड आणि कारवाई

▶▶ **वाळू** : ६६४ प्रकरणात ७ कोटी १० लाखांचा दंड केले आहे. ५९६ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.तर ४६४ आरोपीना अटक केली आहे

▶▶ **मुरूम** : ८७ प्रकरणात ७७९६.८० रूपयांचा दंड केला आहे. ४ गुन्हे दाखल आहेत.१६ वाहने जप्त आहेत. तर दंडा पैकी २३.३२ रूपये दंड वसुल आहे.

▶▶ **माती** : १२ प्रकरणात ४४.४८ रूपयांचा दंड केला आहे.४.७१ रूपये वसुल झाला आहे. दोन वहाने जप्त केली आहेत.

▶▶ **दगड** : १३ प्रकरणे ४२३.७५ रूपयाचा दंड, १७.१६ रूपये वसुल दोन वहाने जप्त

## श्री जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर महामंडळाच्या अध्यक्षपदी दुगाणे

**सुराज्य/सोलापूर**

समतानायक युगपुरुष महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाची नियोजन बैठक उत्तर कसबा येथील मल्लिकार्जुन मंदिरात घेण्यात आली या बैठकीत अनेक विषयांवर चर्चा करुन पदाधिकारी निवड करण्यात आली सन २०२३/२४ च्या उत्सव अध्यक्षपदी संदीप दुगाणे, उपाध्यक्ष साईप्रसाद पाटील, बाळासाहेब आडके, कार्याध्यक्ष जगदीश व्हंड्राव, सचिव शरद गुमटे, सहसचिव सोमनाथ आवजे, मिरवणूक



प्रमुख पवन आलुरे,समर्थ बिराजदार, गुरुनाथ माशाळकर, शैलेश वाडकर, चेतन म्हमाणे, पुजा प्रमुख शांतेश स्वामी, प्रसिद्धी प्रमुख आकाश माकाई, अमित जनगौड यांची सर्वानुमते निवड करून मान्यवरांचे हस्ते सत्कार करण्यात आला याप्रसंगी प्रमुख उपस्थिती माजी नगरसेवक किरण देशमुख, प्रशांत बाबर, गणेश साखरे, आशुतोष वाले, शिवराज विभुते, कपिल कावळे, उंबरजे, प्रविण दर्गोपाटील, अमित रोडगे, आशिष बसवंती, मल्लु पाटील शिवराज झुंजे, कपील कावळे, आशुतोष वाले, शिवराज विभुते आदींसह बसवभक्त संख्येने उपस्थित होते.

## दागिने पॉलिश करून देण्याचा बहाणा; आजीबाईला ४ लाखांना फसवले

**सुराज्य/सोलापूर**

दागिने पॉलिश करून देतो, असे सांगत ७० वर्षांच्या आजीबाईला त्यांचे दागिने हळद आणि पाणी टाकून कुकरमध्ये ठेवण्यास सांगितले. त्यानंतर सोने हातचालाकीने काढून घेतले अन चार लाखांचे दागिने घेऊन आरोपी पसार झाल्याची घटना घडली आहे.

सुनंदा भगवान कदम ( वय ७०) यांनी याबाबत सदर बाझार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सुनंदा कदम आजबाई या घरी असताना बुधवारी दुपारी दोन अज्ञात तरूण त्यांच्याजवळ आले. त्यांनी तांब्या व चांदीचे भांडी आणि दागिने स्वच्छ करून देतो असे सांगितले. त्यानंतर सुनंदा जाधव यांनी आरोपींना घरातील तांब्याचे तामण तसेच चांदीची देवीची मुर्ती पॉलिश करून विश्वास संपादन केला.

तसेच घरातील सोन्याचे दागिने स्वच्छ करून देतो, असे सांगत त्यांच्या सोन्याचे हातातील दोन बांगड्या, गळ्यातील लॉकेट व मण्याची माळ घेतली. पाणी टाकून गरम करण्यास सांगितले. तसेच सोन्याचे दागिने हातचलाखीने घेवून त्यांची फसवणूक केली.

# ब्राह्मण समाज सेवा संघ डॉ. चाटी ट्रस्टचे पुरस्कार जाहीर

### डॉ. देखणे यांना जीवन गौरव तर कुलकर्णी यांना समाज भूषण पुरस्कार

**सुराज्य/सोलापूर**

येथील ब्राह्मण समाज सेवा संघ आणि डॉक्टर त्रिंबक लक्ष्मण चाटी ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने यावर्षी जीवनगौरव पुरस्कारासाठी पॅथॉलॉजिस्ट डॉ. अरविंद देखणे आणि समाजभूषण पुरस्कारासाठी मूळचे सोलापूरचे असलेले आणि सध्या नाशिकमध्ये उद्योजक असलेले मुकुंद कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती ब्राह्मण सेवा संघाचे अध्यक्ष दत्तराज कुलकर्णी आणि डॉ.




चाटी ट्रस्टच्या प्रमुख मीनाताई चाटी यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

हा पुरस्कार वितरण सोहळा एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजता शिवस्मारक सभागृहात मुंबई उच्च न्यायालयातील वकील आणि राज्याचे माजी महाआधिवक्ता अशुतोष कुंभकोणी यांच्या हस्ते होणार आहे.

यावर्षी जीवनगौरव पुरस्कार सोलापूरचे सुप्रसिद्ध पॅथॉलॉजिस्ट डॉ. अरविंद देखणे यांना दिला जाईल. देखणे यांनी पॅथॉलॉजिस्ट म्हणून शहरातील रुग्णांची सेवा केली आहे त्यांच्या कार्याबद्दल त्यांना जीवन गौरव पुरस्काराने भूषविले जाणार आहे. अकरा हजार रुपये रोख, शाल, श्रीफल, पगडी असे जीवन गौरव पुरस्काराचे स्वरूप आहे.

याबरोबरच समाजभूषण पुरस्कार सध्या नाशिक येथे राहणारे पण मूळचे सोलापूरचे असणारे मुकुंदराव कुलकर्णी यांना दिला जाणार आहे. नाशिक परिसरात यशस्वी उद्योजक म्हणून त्यांची ओळख आहे. शाल, श्रीफळ, पगडी असे समाजभूषण पुरस्काराचे स्वरूप आहे, असेही दत्तराज कुलकर्णी म्हणाले. या पुरस्कार वितरण सोहळ्यास नागरिकांनी अवश्य उपस्थित रहावे असे आवाहनही मीनाताई चाटी आणि दत्तराज कुलकर्णी यांनी केले आहे.

## रहदारीस अडथळा; फळ विकणाऱ्या दोघांवर गुन्हा

**सोलापूर** : रहदारीस अडथळा करत फळ विकणाऱ्या दोन फळविक्रेत्यांवर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.अकबर लाडले मशाक मुजावर (वय-४०,रा.चाँदतारा मशीद,विजापूर रोड), नुरअहमद अमिरखान पठाण (वय-३४, रा.साईनाथ भाग ३, मजरेवाडी) असे गुन्हा दाखल झालेल्या दोघांची नावे आहेत.

## सोनके येथील पाटील वस्तीवरील चंदनसाठ्यावर छापा

**सोलापूर** : सोनके (ता. पंढरपूर) येथील एका शेतातील वस्तीवर पोलिसांनी छापा टाकत सुगंधी चंदनसाठा बाळगून त्याची विक्री करण्याऱ्या एकास अटक केली. त्याच्याकडून विविध साहित्यासह साडेचार लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला.

पोलीस उपनिरीक्षक शैलेश खेडकर व त्यांचे पथक पंढरपूर येथे नविन कराडनाका येथे हजर असताना त्यांना बातमी मिळाली. एका शेतातील वस्तीवर एक इसम त्याच्या पत्राशेडच्या समोर करवतीने काही लाकडे कापत असताना दिसला. पोलिसांना पाहून तो पळून जाण्याच्या बेतात असताना त्यास ताब्यात घेतले. त्याचे जवळ एका पांढऱ्या रंगाच्या प्लास्टिकच्या गोणीमध्ये व २ पिशवीमध्ये लाकडे असल्याचे दिसून आले. ती लाकडे चंदनाचीच असल्याची खात्री झाली. त्याच्याकडून ६३ किलोग्रॅम वजनाची सुगंधी चंदनाची लाकडे, लोखंडी करवत, इलेक्ट्रीक वजनकाटा असे साहित्यासह एकूण ४ लाख ५२ हजारांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. ही कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक श्री. शैलेश खेडकर, स.फौ. ख्वाजा मुजावर, नारायण गोलेकर, प्रकाश कारटकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, अक्षय डोंगरे,चालक समीर शेख यांनी बजावली आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून विवाहितेवर अत्याचार

**सोलापूर** : लग्नाचे आमिष दाखवून ३२ वर्षीय पीडितेला कर्नाटकातील बेंगलोर,म्हैसूर आदी ठिकाणी नेऊन अत्याचार करत नंतर लग्नास नकार दिल्याप्रकरणी कुमारगौरव शरणप्पा वाडी (वय-४३, रा. हत्तुरे वस्ती) याच्यावर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पीडितेची ओळख सोलापुरातील आरोपी कुमारगौरव वाडी याच्याशी जानेवारी २०२३ मध्ये झाली.ओळखीतून आरोपीने पीडितेला लग्नाचे आमिष दाखवले. तिला कर्नाटकातील बेंगलोर,म्हैसूर आदी ठिकाणी नेऊन तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर मात्र आरोपीने पीडितेला लग्नास नकार दिला. पिडीतेच्या फिर्यादीवरून कुमारगौरव वाडी याच्यावर अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला आहे.

### किरकोळ कारणावरून मारहाण

मारहाण करत असताना सोडवण्यासाठी गेलेल्या भावाला चार जणांनी मिळून मारहाण केल्यामुळे चौघांवर जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.रविंद्र बाबुराव जाधव (वय-३६,रा. हनुमान नगर, भवानी पेठ) यांनी फिर्याद दिली आहे. ९ एप्रिल रोजी जाधव आपल्या घरात असताना त्यांच्या दोन भावांना राम अशोक सगर, विष्णू सगर, आकाश




अशोक सगर, अशोक सगर (सर्व रा.हनुमान नगर, भवानी पेठ) हे मिळून मारहाण करत होते. तेव्हा जाधव हे भांडण सोडवण्यासाठी गेल्यानंतर त्यांना ही आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच जीवे ठार मारण्याची धमकी दिली. आरोपी राम याने पारेने जाधव यांच्या डोक्याला मारून जखमी केले.या प्रकरणीवरील चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे. तपास हवालदार ओव्हळ करत आहेत.

### सिव्हिल हॉस्पिटल परिसरातून दुचाकी पळवली

सिव्हिल हॉस्पिटल मधील बी ब्लॉक परिसरात लावलेली दुचाकी क्र.एमएच.१३.सीडब्लू.९३९५ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली.याबाबत बसवराज संगप्पा तालिकोटी (वय-४४, रा.कुमठा नाका) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना ८ एप्रिल रोजी घडली. तपास पोलीस हवालदार नदाफ करीत आहेत.

### महिलेच्या डोक्यात घातला टेबल

किरकोळ कारणावरून महिलेच्या डोक्यात लाकडी टेबल घालून मारहाण केल्याची घटना दि.१० एप्रिल रोजी रात्री आठ वाजता दमाणी नगर येथे घडली.याप्रकरणी उषा अजित पवार (वय-३०,रा.दमाणी नगर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून गणेश राजू मोरे (रा.दमानी नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास महिला पोलीस नाईक चौधरी या करीत आहेत.

## मोबाईलसाठी हट्ट; पत्नीने तापाच्या गोळ्या खाल्ल्या

**सोलापूर** : नवीन मोबाईल घेऊन देण्यासाठी पत्नीने जास्त प्रमाणात औषधी गोळ्या खाल्ल्याची घटना मैंदर्गी गावात सोमवारी रात्री घडली. निंबव्वा निंगदळी (वय-३८,रा.मैंदर्गी) असे त्या महिलेचे नाव आहे. सोमवारी रात्री राहत्या घरात पत्नीने मला नवीन मोबाईल घेऊन द्या असे नवऱ्याला म्हटले.नवऱ्याने आठ ते दहा दिवसात नवीन मोबाईल घेऊन देतो असे म्हटले.तेव्हा पत्नीने रागाच्या भरात घरात शिल्लक असलेल्या सर्दी,ताप खोकल्याच्या ३० ते ४० गोळ्या एकदम खाल्ल्या. तिला छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

### १ शिलाई मशीनचे तर ३० सायकलचे वाटप

**सुराज्य/अकलूज**

भाजपाचे जिल्हा संघटन सरचिटणीस धैर्यशील मोहिते-पाटील यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून उत्साहात साजरा करण्यात आला. हजारो नागरिकांनी त्यांना समक्ष भेटून शुभेच्छा दिल्या तर अनेक मान्यवरांनी दूरध्वानीद्वारे अभिष्टचिंतन केले.

प्रारंभी सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील व अकलूजची ग्रामदैव अकलाई देवीचे दर्शन घेतल्यानंतर आई उर्मिलादेवी, पत्नी शितलदेवी व मुली इशिता, राजइंदिरा यांनी धैर्यशील मोहिते-पाटील यांचे औक्षण केले. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, आ.रणजितसिंह मोहिते-पाटील, सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील, शिवतेजसिंह मोहिते-पाटील आ.राम सातपुते यांनी धैर्यशील मोहिते-पाटील यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

सकाळी नऊ वाजल्यापासूनच कार्यकर्त्यांनी त्यांच्या निवासस्थानी शुभेच्छा देण्यासाठी गर्दी केली होती. अनेक कार्यकर्त्यांनी, सामाजिक संघटनांनी, संस्थांनी सामाजिक जाणिवेतून विविध सामाजिक उपक्रम राबवून धैर्यशील मोहिते-पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

यामध्ये शिवामृत दूध उत्पादक संस्थेच्या वतीने सायकल बँक उपक्रमास २० सायकली तर श्रीपूर-महाळूंग येथील कार्यकर्ते सागर यादव, बजरंग भोसले यांच्याकडू १० सायकली भेट देण्यात आल्या. धैर्यशील मोहिते-पाटील मित्रमंडळाच्या वतीने गोरगरीब निराधार महिलांना ३१ शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले. तसेच सत्यशिल मोहिते-पाटील मित्र परिवार व महर्षि जिमखाना व स्पोर्टस् असोसिएशनच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरत १०० पेक्षा अधिक जणांनी सहभाग नोंदवला. ॲड.रणजित भोसले यांनी अकलूज येथील उपजिल्हा रूग्णालयातील




रूग्णांना आरोग्य किट व जेवणाचे किट चे वाटप केले तर एस.बी.ग्रुप चे लक्ष्मण बंदपट्टे यांच्या वतीने पंढरपूर येथील अनाथ आश्रमातील मुलांना अन्नदान करण्यात आले.पत्रकार डी एस गायकवाड यांच्या वतीने यावेळी पॉकेट डायरींचे वाटप करण्यात आले.

धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपाचे पश्चिम महाराष्ट्र संघटन महामंत्री मकरंद देशपांडे, आ.राम सातपुते, ॲड.निहार ठाकरे, पुरूषोत्तम बरडे, दिग्वीजय बागल, मुख्याधिकारी धैर्यशील जाधव यांच्याबरोबरच सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील विविध भागातील मान्यवरांकडून दूरध्वनीद्वारे शुभेच्छा देण्यात आल्या.